# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १४६) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शुक्रवार, दि.०५ जून २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## कुवेत विमानतळावर इराणी ड्रोन हल्ला; एका भारतीयाचा मृत्यू, ६३ जखमी

तेल अवीव दि.४ (वृत्तसंस्था)- काल कुवेत आंतरराष्ट्रीय विमानतळावर झालेल्या इराणी ड्रोन हल्ल्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे. या फुटेजमध्ये, एक ड्रोन विमानतळाच्या छतावर आदळताना आणि त्या धडकेने त्याचे तुकडे-तुकडे होताना दिसत आहे. या हल्ल्यात एका भारतीय नागरिकाचा मृत्यू झाला, तर ६३ जण जखमी झाले. कुवेतच्या आरोग्य मंत्राल याच्या माहितीनुसार, अनेक व्यक्तींना डोक्याला आणि शरीराच्या इतर भागांना गंभीर दुखापती झाल्या आहेत.

या हल्ल्यामुळे विमानतळाच्या 'टर्मिनल १' चे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. परिणामी, सुरक्षेचा उपाय म्हणून काही काळासाठी हवाई वाहतूक तात्पुरती स्थगित करण्यात आली होती.

अमेरिकेच्या प्रतिनिधी सभेत इराणविरुद्ध सुरू असलेल्या लष्करी कारवाया थांबवण्याच्या उद्देशाने एक ठराव मंजूर केला आहे. या ठरावानुसार, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे काँग्रेसच्या मंजुरीशिवाय लष्करी कारवाई सुरू ठेवू शकणार नाहीत. प्रतिनिधीगृहात हा ठराव २१५ विरुद्ध २०८ मतांनी मंजूर करण्यात आला. चार रिपब्लिकन खासदारांनीही डेमोक्रॅट्सची बाजू घेत, ट्रम्प यांच्या विरोधात मतदान केले.

# विधानपरिषद निवडणूक: महायुतीच्या ५ जागा बिनविरोध

## १२ ठिकाणी महायुती आणि मविआ आमने सामने लढणार

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज संस्था मतदारसंघाच्या १७ जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरु आहे. उमेदवारी अर्ज मागं घेण्याच्या दिवशी राज्यभरात मोठ्या घडामोडी पाहायला मिळाल्या. राज्यातील सत्ताधारी महायुतीच्या उमेदवारांसमोर महाविकास आघाडीनं आव्हान उभं करण्याचा प्रयत्न केला. मात्र, मविआच्या काही उमेदवारांनी संख्याबळाचं कारण, मित्रपक्षांचं सहकार्य मिळत नसल्याचा आरोप करत माघार घेतली. तर, महायुतीच्या नेत्यांना देखील बंडखोरांना शांत करण्यात यश आलं. नितेश राणे थेट ठाकरेंच्या शिवसेनेचे कोकण विधानपरिषदेचे उमेदवार बाळ माने यांना अर्ज मागं घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाले. तर, नाशिकमध्ये गोकुळ गीते अर्ज माघारीवरुन चर्चेत राहिले, तर गणेश गीते यांनी सकाळीच अर्ज मागं घेणार असल्याचं स्पष्ट केलं. अर्ज माघारीच्या दिवशी पाच जागा बिनविरोध झाल्या, यात दोन शिवसेना, दोन राष्ट्रवादी काँग्रेस आणि एका जागेवर भाजपनं बिनविरोध विजय मिळवला.

रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्गमध्ये महायुतीच्या जागावाटपात ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहे. या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेसनं अनिकेत तटकरे यांना उमेदवारी दिली आहे. ठाकरेंच्या शिवसेनेकडून बाळ माने यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र, बाळ माने मंत्री नितेश राणे यांच्यासोबत जिल्हाधिकारी कार्यालयात आले आणि त्यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला. शेकापच्या अरविंद म्हात्रे यांच्याकडून अर्ज मागं घेण्यात आला. पक्षविरोधी कारवाईमुळं बाळ मानेंची ठाकरेंच्या सेनेतून हकालपट्टी केल्याचं संजय राऊत यांनी जाहीर केलं. या मतदारसंघात अनिकेत तटकरे बिनविरोध विजयी झाले.

पुणे स्थानिक स्वराज संस्था मतदारसंघातून आज राष्ट्रवादीचे सुनील टिंगरे, भाजपचे बंडखोर उमेदवार प्रदीप कंद यांनी माघार घेतली. तर, महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे श्रीकांत पाटील यांनी माघार घेतल्यानं विक्रम काकडेंच्या बिनविरोध विजयाचा मार्ग सुकर झाला. पुण्यात राष्ट्रवादीचे विक्रम काकडे बिनविरोध विजयी झाले.

अहिल्यानगरमध्ये काँग्रेसच्या पाठिंब्यावर करण ससाने यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता, तो देखील त्यांनी मागे घेतला आहे. प्राजक्त तनपुरे यांच्या विरोधात अपक्ष उमेदवार दत्तात्रय पानसरे यांचा उमेदवारी अर्ज बाकी होता. शहाबाज सय्यद यांनी दत्तात्रय पानसरेंचा अर्ज मागं घेतल्याच समोर आलं. दत्तात्रय पानसरे यांनी अर्ज मागे घेतला नसल्याचं म्हटलं.

ठाण्यात एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे रवींद्र फाटक उमेदवार आहेत. त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून अभिजीत पवार यांना उमेदवारी देण्यात आलेली मात्र त्यांनी देखील माघार घेतली.

रवींद्र फाटक बिनविरोध विजयी झाले.

नाशिक स्थानिक स्वराज संस्था मतदारसंघ अर्ज मागं घेण्याच्या दिवशी चर्चेत राहिला. हा मतदारसंघ एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेकडे असून तिथून नरेंद्र दराडे उमेदवार आहेत. भाजपच्या गणेश गीते यांनी उमेदवारी अर्ज मागं घेतला. मात्र, गोकुळ गीते यांनी अर्ज कायम ठेवला. यामुळं या ठिकाणी नरेंद्र दराडे विरुद्ध गोकुळ गीते अशी लढत होईल.

# देशात भयंकर आर्थिक त्सुनामी येणार

## आणीबाणीसारखी परिस्थिती उद्भवणार असल्याचा राहुल गांधी यांचा दावा



नवी दिल्ली दि.४ (वृत्तसंस्था)- अमेरिका-इराण युद्ध अद्यापही पूर्णपणे संपलेलं नाही. या युद्धामुळे पश्चिम आशियातील तणाव कायम असल्यामुळे याचा फटका जगातील अनेक देशांना बसत आहे. अमेरिका-इराण युद्धाचे परिणाम भारताला देखील सहन करावे लागत आहेत. त्या पार्श्वभूमीवर उपाययोजना म्हणून काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेला इंधन बचतीचं आवाहन केलं होतं. इंधनाची बचत करणं आणि पेट्रोल व डिझेल खरेदीवर खर्च होणारे परकीय चलन वाचवणं ही आपली जबाबदारी असल्याचं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं होतं.

दरम्यान, सध्या पेट्रोल व डिझेलच्या दरात झालेली वाढ आणि पश्चिम आशियातील तणावामुळे आर्थिक संकटाबाबत बोलताना लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. तसेच आर्थिक संकटाबाबत राहुल गांधी यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. 'देशात भयंकर आर्थिक त्सुनामी येणार आहे', असा मोठा दावा राहुल गांधी यांनी केला आहे. तसेच एका वर्षभरानंतर मोदी पंतप्रधान नसतील असा मोठा दावा देखील राहुल गांधी यांनी केला आहे.

''देशावर भयंकर आर्थिक त्सुनामी येणार आहे. एवढं मोठं आर्थिक संकट येणार आहे की तुम्ही ते कधीही पाहिलं नसेल. देशातील परिस्थिती बदलत आहे. अनेक यंत्रणांमध्ये अस्वस्थता मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचं चित्र आहे. लोकांच्या विरोधामुळे आणीबाणीसारखी परिस्थिती निर्माण होऊ शकते'', असं मोठं वक्तव्य राहुल गांधी यांनी एका कार्यक्रमात बोलताना केलं आहे.

राहुल गांधी यांनी देशात आर्थिक त्सुनामी येणार असल्याचा दावा केल्यानंतर भाजपाचे नेते अमित मालवीय यांनी एक्सवर (ट्विटर) एक पोस्ट शेअर करत राहुल गांधी यांच्यावर जोरदार टीका केली. तसेच राहुल गांधी हे देशात भीती पसरवत असल्याचा आरोप केला आहे.

## अमेरिकेकडून भारतावर १२.५ टक्के अतिरिक्त कर लादण्याचा प्रस्ताव

वॉशिंग्टन दि.४ (वृत्तसंस्था)- मनमानी आयात शुल्क आकारणीस अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाने बेकायदा ठरवल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प प्रशासन आता शुल्कांसाठी नवनवीन कारणे शोधू लागले आहे. ताज्या घडामोडीत भारतासह एकूण ५४ देशांवर १२.५ टक्के अतिरिक्त आयात शुल्काचा प्रस्ताव असून यासाठी वेठबिगारी रोखण्यात आलेले कथित अपयश हे कारण देण्यात आले.

वेठबिगारीच्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या उत्पादनांची अमेरिकेत आयात थांबवण्यासाठी युनायटेड स्टेट्स ट्रेड रिप्रेझेंटेटिव्ह (यूएसआरटीआर) विभागाने हा उपाय सुचवला आहे. या यादीत भारत, चीन, जपान, ब्राझील, ऑस्ट्रेलिया, ब्रिटन आणि सौदी अरेबियासह एकूण ५४ देशांचा समावेश आहे. यासंबंधी अमेरिकेने भारत किंवा इतर देशांमध्ये 'तपास' करणे याला अनेक देशांनी आक्षेप घेतला. त्यामुळे हा संघर्ष भविष्यात चिघळण्याची चिन्हे आहेत.

सध्या अमेरिकेने सर्व देशांवर सरसकट १० टक्के आयातशुल्क आकारले आहे. त्यात अमेरिकेशी व्यापार करत असलेल्या ६० देशांमध्ये कामगारांकडून जबरदस्तीने काम करवून घेतले जात असल्याच्या आरोपावरून अमेरिकेने मंगळवारी तपास सुरू केला. त्यानंतर 'यूएसटीआर'ने अतिरिक्त शुल्काचा प्रस्ताव मांडला. वेठबिगारीच्या प्रकारांना प्रतिबंध करण्यास अपयश आल्याचे 'यूएसटीआर'चे म्हणणे आहे. अशा प्रकारे उत्पादित वस्तूंची आयात मान्य नसल्याचे अमेरिकी व्यापार कायदा १९७४च्या अनुच्छेद ३०१ मध्ये नमूद आहे.

# प्रतीक्षा संपली ! मान्सून केरळमध्ये दाखल

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या केरळमध्ये अखेर गुरुवारी मान्सूनचे आगमन झाले. हवामान विभागाने याबाबत गुरुवारी अधिकृत माहिती दिली. त्यामुळे राज्यातील नागरिकांचे लक्ष आता मान्सूनच्या पुढील वाटचालीकडे लागले आहे. याबाबतही हवामान विभागाने माहिती दिली. दरम्यान, पुढील तीन चार दिवस राज्यातील काही जिल्ह्यात हवामान विभागाने 'ऑरेंज', तर बहुतांश जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' दिला आहे.

दरम्यान, हवामान विभागाच्या अंदाजानुसार राज्यात पुढील तीन ते चार दिवस वादळी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या दरम्यान सोसाट्याच्या वाऱ्यासह, वादळी पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तसेच पुढील काही दिवसात मान्सूनचे आगमन राज्याच्या दक्षिण किनारपट्टीवर होण्याचा अंदाज आहे.

पुढील दोन ते तीन दिवसांत नैऋत्य मान्सून आणखी पुढे सरकण्यासाठी परिस्थिती अनुकूल असल्याची माहिती हवामान विभागाने दिली. पुढील दोन ते तीन दिवसांत मोसमी वारे संपूर्ण गोव्यासह राज्याच्या काही भागात दाखल



होण्याचा अंदाज आहे. गेल्यावर्षी २४ मे रोजी केरळ येथे दाखल झालेला मान्सून राज्याच्या दक्षिण किनारपट्टीवर दुसऱ्याच दिवशी म्हणजे २५ मे रोजी दाखल झाला होता, तर २६ मे रोजी मान्सूनचे आगमन मुंबईत झाले होते. यंदा मान्सून सरासरी वेळेच्या तीन दिवस उशिराने केरळ येथे दाखल झाला आहे.

राज्यात सध्या मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात वादळी पावसाची स्थिती आहे. तर काही भागात गारपिटीची नोंद होत आहे. कोकण प्रदेशातील काही भागातही मान्सून पूर्व सरी बरसत आहेत. वादळी पावसामुळे तीव्र उन्हापासून नागरिकांना काहीसा दिलासा मिळत आहे. दरम्यान, राज्यातील काही भागात शुक्रवारीही वादळी पावसाची शक्यता आहे.

## काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनंतराव थोपटे यांचं निधन

पुणे दि.४ (प्रतिनिधी)- राज्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनंतराव थोपटे यांचं निधन झालं आहे. वयाच्या ९३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला आहे. पुण्यातील दिनानाथ मंगेशकर रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते. उपचारादरम्यान, अल्पशा आजाराने त्यांचं निधन झालं आहे. त्यांच्या निधनाने राजकीय सामाजिक क्षेत्रातून हळहळ व्यक्त केली जात आहे. अनंतराव थोपटे हे पुण्यातील भोर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार होते. तसेच भोर विधानसभा मतदारसंघाचे त्यांनी अनेक वर्षे नेतृत्व केले होते. अनंतराव थोपटे अनेक वर्षे राज्य मंत्री मंडळात कॅबिनेट मंत्री होते. तसेच ते पुण्याचे पालकमंत्री देखील राहिले होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेनंतर थोपटे काँग्रेसचे विधीमंडळातील गटनेते होते.

## विषारी दारू प्रकरणी कारवाई करा; आमदार अंबादास दानवेंचे मुख्यमंत्र्यांना पत्र

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- हडपसर, फुगेवाडी आणि दापोडी परिसरातील विषारी दारू प्रकरणात मृत्यू झालेल्या नागरिकांना न्याय मिळावा तसेच संबंधित पोलिस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शिवसेना नेते तथा राज्याचे माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते, आमदार अंबादास दानवे यांनी राज्याचे मुख्यमंत्री आणि पोलिस महासंचालकांना पत्राद्वारे केली आहे.

अवैध दारूविक्रीचे अड्डे वर्षानुवर्षे सुरू असताना संबंधित यंत्रणांनी दुर्लक्ष केले आहे. या प्रकरणात मुख्य आरोपींसह संबंधित पोलिस व उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांवरही खुनाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी दानवे यांनी केली आहे.

विषारी दारूमुळे मृत्यू झालेल्या कुटुंबांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, प्रकरणाचा जलदगती न्यायालयात खटला चालवावा आणि मिथेनॉलसारखे घातक रसायन राज्यात कसे पोहोचले याचीही सखोल चौकशी करावी, अशी मागणी दानवे यांनी पत्रातून केली आहे.

सदरील घटनेतील मृत्यू फक्त विषारी दारूमुळे घडलेले नसून प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे झालेली मानवी हत्या असल्याचा आरोप करत दोषींना कठोर शिक्षा देण्याची मागणी अंबादास दानवे यांनी केली आहे. तर, वृक्षारोपण व संगोपन कामांच्या निविदा प्रक्रियेत कथित अनियमितता झाली असून अंबादास दानवे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंत्यांकडे चौकशीची मागणी केली आहे.

## जंतरमंतरवर कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाची तयारी

नवी दिल्ली दि.४ (वृत्तसंस्था)- कॉकरोच जनता पार्टीने दिल्लीत पहिली पत्रकार परिषद घेतली. पक्षाच्या तीन प्रवक्त्यांनी प्रथमच जनतेला संबोधित करून आपल्या मागण्या मांडल्या. त्यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीचा पुनरुच्चार केला आणि सरकार व विरोधी पक्ष या दोघांशीही संवाद साधण्यास तयार असल्याचे सांगितले. सीजेपीचे प्रवक्ते सौरभ दास यांनी सीबीएसईचे अध्यक्ष राहुल सिंह आणि सचिव हिमांशू गुप्ता यांच्या बदल्या केवळ दिखावा असल्याचे म्हटले आहे. शिक्षण व्यवस्थेत उत्तरदायित्व प्रस्थापित झाले पाहिजे आणि केवळ बदल्यांनी समस्या सुटणार नाही, असे त्यांनी म्हटले.

सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके ६ जून रोजी अमेरिकेतून दिल्लीत दाखल होतील. त्यानंतर ते जंतर मंतर येथे आंदोलनासाठी परवानगी मागण्यासाठी पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाण्यात जातील. पक्षाने देशभरातील तरुणांना या आंदोलनात सामील होण्याचे आवाहन केले आहे. हवामान कार्यकर्ते सोनम वांगचुक हे देखील या आंदोलनात सामील होऊ शकतात, असा दावा पक्षाने केला आहे. सीजेपी नेत्यांनी सांगितले की, हे आंदोलन शिक्षण व्यवस्था आणि राजकीय व्यवस्थेबद्दल तरुणांमध्ये वाढणाऱ्या असंतोषाचे प्रतिबिंब आहे.

दरम्यान, केंद्र सरकारने केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाशी संबंधित मुद्द्यांवर एक मोठे पाऊल उचलले आहे. सीबीएसईचे अध्यक्ष राहुल सिंह आणि सचिव हिमांशू गुप्ता यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. सीबीएसईच्या 'ऑन-स्क्रीन मार्किंग' प्रणालीमध्ये मोठ्या प्रमाणावर झालेल्या कथित अनियमिततेनंतर हे पाऊल उचलण्यात आले आहे.

सीबीएसईने ऑन-स्क्रीन मार्किंग प्रक्रियेतील अनियमिततेची चौकशी करण्यासाठी एक चौकशी समितीही स्थापन केली आहे. ही समिती सखोल चौकशी करेल. या समितीची नियुक्ती क्षमता विकास आयोगाच्या अध्यक्षा एस. राधा चौहान यांच्याकडे करण्यात आली आहे. गरज भासल्यास त्या इतर विभागांतील अधिकाऱ्यांची मदत घेऊ शकतात.

## ओबीसींचे १२ जूनला राज्यव्यापी आंदोलन

### ओबीसी जनमोर्चाचे नेते प्रकाश शेंडगे यांची घोषणा

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी नुकत्याच केलेल्या उपोषणानंतर राज्य सरकारने त्यांच्या मागण्या मान्य केल्यानंतर ओबीसी नेते कमालीचे आक्रमक झाले आहेत. ओबीसी जनमोर्चाचे नेते प्रकाश शेंडगे यांनी येत्या १२ जून रोजी राज्यव्यापी आंदोलनाची घोषणा केली असून आंदोलनापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ओबीसी नेत्यांना वेळ देऊन त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

मुंबई मराठी पत्रकार संघात बुधवारी प्रकाश शेंडगे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत सरकार आणि मराठा आंदोलकांवर गंभीर आरोप केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ओबीसी आरक्षणातील तब्बल ९० टक्के जागांवर कुणबी समाजाच्या नावाने बोगस दाखले काढून जागा हडप केल्या गेल्याचा दावा त्यांनी केला.

'मराठा समाजाला २५ हजार कोटी दिले जातात, मग पावणेचारशे जमाती असलेल्या ओबीसींना निधीच्या समान वाटपाचे दिलेले वचन का पाळले नाही?'' असा सवाल करत शेंडगे म्हणाले की, मंत्रिमंडळ उपसमितीने तात्काळ राजीनामा देऊन नवीन उपसमिती स्थापन करावी.

## देशात एकच पक्ष रहावा हा भाजपचा विचार-संजय राऊत

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- देशात एकच पक्ष रहावा हा भाजपचा विचार आहे, त्या अनुषंगाने ते काम करत आहेत. एकपक्षीय राजकारणाची ही मुहूर्तमेढ आहे, या देशात फक्त आमचाच पक्ष राहील, आमचाच पक्ष राज्य करेल. इतर कोणताच प्रादेशिक पक्ष राहणार नाही, या दृष्टीने शिवसेना फोडली, त्यासाठी यंत्रणेचा वापर केला, पासवान यांचा पक्ष तसाच फोडला, शरद पवारांचा पक्ष फोडला, पश्चिम बंगालमध्ये सुद्धा तेच सुरू आहे, पण हे लोकशाहीसाठी चांगले नाही, तुम्ही संविधान आणि राष्ट्रप्रेमी नाही हे त्यातून सिद्ध होत आहे, असे उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत म्हणाले की, भाजपने एका दिवसात राष्ट्रवादीतून आलेल्या लोकांना उमेदवारी दिली त्यांना लाज वाटली पाहिजे. नैतिकतेचा टेंभा मिरवणाऱ्यांना लाज वाटली पाहिजे की ज्यांच्यावर आरोप केला त्यांना विधान परिषदेची उमेदवारी दिली. प्राजक्त तनपुरे यांना उमेदवारी मिळाली त्यांना लाज वाटली पाहिजे. ठेकेदारांना संधी देता त्यांनी काय सामाजिक कार्य केले? केवळ संपत्ती आहे म्हणून विधान परिषद दिली जात आहे. यापेक्षा राज्यसभा आणि विधान परिषद नसलेली बरी असे राऊतांनी म्हटले आहे.

विधान परिषद निवडणूक ही कार्यकर्त्यांची निवडणूक राहीली आहे का तर नाही. जो मतदार विकत घेऊ शकतो तोच ही निवडणूक लढवू शकतो. त्यामुळे संकटमोचक असे काही राहिले नाही. मतदार दोघांकडून तिघांकडून पैसे घेतील. या निवडणुकीला काही अर्थ राहिलेला नाही. विधान परिषदेमध्ये अभ्यासू लोकं जात होते पण आता त्याचा कचरा डेपो झाला आहे असे म्हणावे लागेल. ही काही निकोप लोकशाहीचे लक्षण नाही. नाशिकमध्ये आमचा उमेदवार नाही, पण ही लढाई महायुतीमध्येच होणार आहे, ज्याचा भाव जास्त तो निवडून येईल. संकटमोचक यात काहीच करू शकत नाही. जो पैसा देणार तो निवडून देईल असे राऊत म्हणाले.

## ममता बॅनर्जींना धक्का; दोन दिवसांत दोन महापौरांचे राजीनामे

कोलकाता दि.४ (प्रतिनिधी)- पश्चिम बंगालमधील विधानसभेच्या निवडणुकीत ममता बॅनर्जी यांना आलेल्या अपयशानंतर तृणमूल काँग्रेसमध्ये मोठ्या राजकीय घडामोडी घडत आहेत. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर अनेक नेत्यांनी तृणमूल काँग्रेस पक्षाचे राजीनामे दिले आहेत. यातच तृणमूल काँग्रेस पक्षात फूट पडली असल्याने पश्चिम बंगालच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.

या घडामोडी सुरू असताना फिरहाद हकीम यांनी कोलकाता महापालिकेच्या महापौरपदाचा ३ जून रोजी राजीनामा दिला. त्यानंतर आज (४ जून) कृष्णा चक्रवर्ती यांनी बिधाननगर महापालिकेच्या महापौरपदाचा राजीनामा दिल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या दोन दिवसांत दोन मोठ्या महापालिकेच्या महापौरांनी राजीनामे दिल्यामुळे ममता बॅनर्जी यांना पुन्हा एकदा मोठा धक्का बसला आहे.

वृत्तानुसार, बिधाननगर महानगरपालिकेच्या महापौर कृष्णा चक्रवर्ती यांनी गुरुवारी महापौर पदाचा राजीनामा दिला आहे. तसेच कृष्णा चक्रवर्ती यांनी आपल्या राजीनामा देण्यामागचं कारण वैयक्तिक असल्याचा उल्लेख केला आहे. या संदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहे.

''मी (पान ४ वर)

# कर्जमाफी नको कर्जमुक्ती द्या; कोल्हापुरात शेतकऱ्यांचा एल्गार

कोल्हापूर दि.४ (प्रतिनिधी)- राज्य शासनाने जाहीर केलेली कर्जमाफीतुटपुंजी असल्याचा आरोप करीत महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या वतीने गुरुवारी या आदेशाची होळी करण्यात आली. केवळ कर्ज माफी नव्हे तर सरसकट विनाअट कर्जमुक्तीची मागणी करत किसान सभेच्या वतीने येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. यावेळी कर्जमाफी नको कर्जमुक्ती द्या, उद्योगपतींना सोळा लाख कोटी कर्ज माफ करणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, शेतकऱ्यांना शेतमालाला हमीभाव मिळालाच पाहिजे, जय जवान जय किसान, खाजगी सावकारांकडचीही कर्जमाफी करा अशा घोषणा देण्यात आल्या.

यावेळी किसान सभेचे राज्य सचिव गिरीश फोंडे म्हणाले,'' सरकारची ही कर्जमाफी योजना फसवी आहे. सरकारने केवळ पन्नास हजार अनुदान देऊन शेतकऱ्यांची बोळवण केली आहे. हे सरकार उद्योगपतींची कर्जमाफी करते शेतकऱ्यांची नाही. लाडकी बहीण योजनेप्रमाणे




अटी लावून लाखो शेतकऱ्यांना या योजनेतून बाहेर ढकलले जाईल. या विरोधात संपूर्ण कर्जमुक्तीसाठी राज्यव्यापी आंदोलन उभारणार आहोत. शेतकरी शिवाजी कांबळे म्हणाले,'' सरकारने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च ,अवजारे, खतांचा खर्च, इंधन खर्च वाढला आहे याचा विचार न करता शेतकऱ्यांची फसवणूक केली.''यावेळी शिष्टमंडळाने निवासी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले. निवासी जिल्हाधिकारी यांनी शेतकऱ्यांच्या भावना शासनापर्यंत लेखी कळवण्याचे आश्वासन दिले.

## तुकाराम मुंढे यांना राष्ट्रपती पुरस्कार द्या; माजी मंत्र्यांचे थेट राष्ट्रपतींना पत्र

बुलढाणा दि.४ (प्रतिनिधी)- सुबोध सावजी म्हणजे जिल्ह्याच्या राजकीय इतिहासातील एक आगळे वेगळे व्यक्तिमत्व, आले अंगावर तर घेतले शिंगावर या वृत्तीने राजकारण करणारा काँग्रेस नेता. मेहकर विधानसभा मतदारसंघातून तीनवेळा निवडून आलेले आमदार, राज्यमंत्री, अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री असा त्यांचा राजकीय प्रवास. ते राजकरणातून (सक्तीने ) निवृत्त झाले असले तरी ते विविध प्रश्नांवर भाष्य करतात. विद्यमान केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, आमदार सिद्धार्थ खरात यासंह अन्य नेत्यांना, पक्षांना (अनाहुत) सल्ले देतात, राष्ट्रीय व राज्य पातळीवरील मोठ्या घडामोडी वर व्हिडीओ द्वारे व्यक्त होत राहतात

सध्या चर्चेत असलेले अन्न औषध चे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या विषयी सावजी यांना प्रेम, आदर आहे. या प्रेमाच्या भरात त्यांनी थेट देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निवेदन वजा पत्र पाठवून मुंडे यांचा राष्ट्रपतीनी सन्मान करावा अशी मागणी केली आहे. महाराष्ट्रातील अत्यंत प्रामाणिक आणि धडाकेबाज सनदी अधिकारी, अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना (पान ४ वर)

# पर्यावरण संतुलनासाठी वृक्ष लागवड महत्त्वाची

आज पर्यावरण प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. मानवाकडून पर्यावरणावर अनेक मोठे मोठे आघात होत आहेत. या आघातांनी पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात झीज होत आहे. पर्यावरणाचा ऱ्हास मोठ्या प्रमाणात मानवाकडून होत असल्यामुळे पर्यावरण संतुलन कमालीचे ढासळलेले आहे. प्रचंड प्रमाणातील वृक्ष तोड मोठ्या प्रमाणात वाळू उपसे, तसेच जमिनीतून दगड उचलणे, प्राणी व पक्ष्यांची शिकार करणे हे प्रकार पर्यावरणाचा समतोल ढासळण्यास कारणीभूत ठरत आहेत. या सोबत मोठमोठ्या कारखान्यातून बाहेर पडणारा कार्बन डाय ऑक्साईड, कार्बन मोनाक्साईड, कारखान्यातील दूषित पाणी, कारखान्यातील वेस्टेज पदार्थ, यासर्व बाबी पर्यावरण प्रदूषित करण्यासाठी कारणीभूत आहेत. केरकचरा, कागद, गटारीची घाण, प्लॅस्टिक पिशव्या या सर्व वस्तू सभोवतालच्या वातावरणात टाकणे, दवाखान्यातील पदार्थ वातावरणात फेकणे या बाबी पर्यावरणाला अत्यंत दुषित व रोगट करतात याचा परिणाम मानवाला, पशुपक्ष्यांना, प्राण्यांना भोगावा लागतो. या सर्व बाबी पर्यावरण दूषित करण्यास व पर्यावरणाचा समतोल ढासळण्यास कारणीभूत होत आहे.

मानवाला या सर्व बाबी माहीत आहेत. पर्यावरण असंतुलन याबाबीमुळे होत आहे. याची सुस्पष्ट कल्पना मानवाला आहेच मात्र हे प्रकार थांबवण्यासाठी किंवा या प्रकारांना आळा घालण्यासाठी ठोस पावले उचलल्या जात नाहीत. यामुळे पर्यावरण संतुलन ढासळत आहे. निसर्ग या सर्व प्रकारांनी व्यापलेला असल्यामुळे तो वेगवेगळ्या प्रसंगी रौद्ररूप धारण करून मानवाला त्याच्या या चुकांची कल्पना देतो तरीही अद्याप मानवाने नैसर्गिक आपदांच्या विदारक घटनापासून धडा घेतलेला नाही. मानवप्राणी वेळीच सावध झाला नाही तर उद्या या निसर्गाच्या रौद्ररूपाला सामोरे जावे लागेल. ज्याचे खूप गंभीर विदारक व घातक परिणाम बाहेर येतील

भूकंप, त्सुनामी, अवेळीचा पाऊस, हिमवर्षाव, ढगफुटी, पूर, महापूर, ज्वालामुखी अशा कितीतरी, नैसर्गिक आपत्ती, मानवाच्या निष्काळजीपणाने होत असलेल्या पर्यावरणाच्या हननामुळे ओढवत आहेत हे विसरून चालणार नाही. वरील आपत्तीनी फार मोठ्या प्रमाणात जिवीत व वित्तहानी झालेली आहे. निसर्ग जेवढा निरागस आहे. दयाळू, कनवाळू आहे तेवढाच तो विध्वसंक सुध्दा आहे. जगातील अनेक राष्ट्रावरील नैसर्गिक संकटातून हे दिसून आलेले आहे. निसर्गाच्या या आपत्तीवर मानव मात करू शकत नाही किंवा त्यावर ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विजय ही मिळिवणे शक्य नाही. मात्र या नैसर्गिक आपत्तींना काहीशा प्रमाणात नियंत्रणात निश्चित आणता येईल. यासाठी संपूर्ण जगात वृक्ष लागवडीचा व्यापक कार्यक्रम हाती घेणे, निसर्गातील वस्तूंची जपवणूक करणे आहे त्यात आणखी भर घालणे याबाबी मानवाला शक्य आहेत यात सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे वृक्ष लागवड होय. वृक्ष लागवड, संरक्षण व संवर्धन हा उपक्रम पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी निश्चित उपयुक्त ठरू शकतो मात्र यासाठी संपूर्ण विश्वात सर्वंकष प्रयत्न व्हायला हवेत. पावसाळ्याच्या चारही महिन्यात सर्व थरावर वृक्ष लागवडीचे मोठमोठे उपक्रम घेण्यात येतात. मोठ्या प्रमाणात वृक्ष लावली जातात. मात्र त्यांची जोपासना, संरक्षण व संवर्धन होत नाही. त्यामुळे लावलेली वृक्षे किती जगली याच आढावा कुणीही घेत नाही. वृक्ष लागवडच केवळ महत्त्वाची नसून लावलेल्या वृक्षांची जोपासना करणे लावलेल्या वृक्षांच्या प्राणीपक्षीपासून संरक्षणासाठी ट्री गार्ड उपलब्ध करून घ्यावा, नियमाप्रमाणे पाणी मिळावे या बाबी महत्त्वाच्या आहेत. शेताच्या बांधावर, रस्त्याच्या दुतर्फा, बंगल्याच्या आवारात, गायरान, माळरान, डोंगर टेकडी या सर्व ठिकाणी वृक्षलागवड मोठ्या प्रमाणात व्हावी व त्या वृक्षांची जबाबदारी त्या भागातील नागरिकांवर सोपवावी अशी सक्ती २-४ वर्ष झाल्यास वसुंधरा प्रचंड प्रमाणातील वृक्ष वेलींनी मढून जाईल व यामुळे पर्यावरण संतुलन राखण्यासाठी मदतच होईल.शेतकरी वर्गाने आपल्या शेताच्या चारही दिशांना बांधावर, विहिरीजवळ व खाली जागी फळफळावरच्या वृक्षांची लागवड करावी याचा लाभ शेतकरी मंडळींना आर्थिक बाजू सक्षम करण्यासही सहाय्य होईल व जमिनीची धूप थांबण्यासही सहाय्य होईल. वृक्ष मानवाचे मित्र खरे जंगलातील गायरानातील, अंगणातील, बांधावरील किंवा अन्य ठिकाणचे सर्व वृक्ष मानवाचे जिवलग मित्र असतात या झाडांच्या विविध प्रकारच्या गुणांवर व्यक्ती त्या झाडाशी मैत्री करते यासाठी मानवाने झाडांशी मैत्री गाढ करावी अर्ध्यावरती डाव मोडून जीवनाची घडी विस्कळीत करू नये. वृक्षांमुळे जमिनीची धूप थांबते. शेतजमिनीची पोत टिकून राहून जमिनीत गारवा धरून ठेवते. वृक्षांचा लाभ शेतकरी वर्गासच होतो असे नाही तर प्राणी, पशु, पक्षी यांनाही होतो. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा उपयोग झाडांचा असल्यामुळे प्रत्येकाने झाड लावून त्यांचे रक्षण त्यांचे संवर्धन करावयास हवे. झाडांचे अनेक फायदे औषधी निर्मितीसाठी सुद्धा होता. झाडांच्या पानामध्ये जलाकर्षण शक्ती असते. झाडामुळे खूप पाऊस पडतो व जमीन सुपीक राहते. झाडांची पाने जमिनीत सडवून सेंद्रीय खत निर्माण केल्या जाते. ज्याचा उपयोग सुपीक जमिनीसाठी होतो. झाडांनी पर्यावरण शुद्ध हवेचे असते. भरपूर झाडे असलेल्या वातावरणात सदा सर्वदा शुद्ध व स्वच्छ हवा मोठ्या प्रमाणात असते.

हिरव्या पानावर सतत दृष्टी पडल्यास डोळ्यांचे अनेक आजार दूर होतात. निंबाच्या झाडाचे महत्त्व सर्वांना माहितच आहे. पिंपळाच्या पानाचा रस व निंबाच्या पानाचा रस उत्तम आरोग्य ठेवण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. पर्यावरणाचे संतुलन राखून भविष्यात ओढवू पाहणाऱ्या आपत्ती टाळावयाच्या असतील तर गावातील, शहरातील प्रत्येक व्यक्तीने, मुलांनी, मुलींनी एक झाड तरी दरवर्षी लावून त्यांचे संवर्धन संरक्षण व संगोपन करायलाच हवे. समाजातील सामाजिक, शैक्षणिक संस्था व मंडळे यांनी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करावे.

# पर्यावरणसंवर्धन, शाश्वत विकास आणि मानवजातीचे भविष्य

**मानव** आणि निसर्ग यांचे नाते हे सृष्टीच्या निर्मितीइतकेच प्राचीन आहे. पृथ्वीवरील जीवनाची संपूर्ण व्यवस्था पर्यावरणावर आधारलेली आहे. हवा, पाणी, माती, वनस्पती, प्राणी, पर्वत, नद्या, समुद्र, जंगल आणि वातावरणातील विविध घटक यांच्या परस्पर संबंधातून पर्यावरणाची निर्मिती होते. पर्यावरण हा केवळ एक शब्द नसून तो जीवनाचा पाया आहे. आपण घेत असलेला प्रत्येक श्वास, आपण पित असलेले पाणी, आपण खात असलेले अन्न आणि आपल्या जीवनासाठी आवश्यक असलेली प्रत्येक नैसर्गिक गोष्ट पर्यावरणातूनच प्राप्त होते. म्हणूनच पर्यावरणाचे संरक्षण म्हणजे मानवाच्या अस्तित्वाचे संरक्षण होय. परंतु गेल्या काही दशकांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, औद्योगिकीकरण आणि शहरीकरणाच्या झपाट्याने झालेल्या विस्तारामुळे पर्यावरणावर अभूतपूर्व ताण निर्माण झाला आहे. विकासाच्या नावाखाली नैसर्गिक संसाधनांचा अविचारी वापर, जंगलतोड, प्रदूषण, जैवविविधतेचा ऱ्हास आणि हवामान बदल यांसारख्या समस्या गंभीर बनल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी आणि जनजागृती निर्माण करण्यासाठी दरवर्षी ५ जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून साजरा केला जातो.

जागतिक पर्यावरण दिन हा जगातील सर्वात मोठा पर्यावरणीय जनजागृती उपक्रम मानला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाच्या पुढाकारातून या दिवसाची सुरुवात झाली. १९७२ साली स्वीडनमधील स्टॉकहोम येथे 'मानवी पर्यावरण परिषद' आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत पर्यावरण संरक्षणाची गरज आणि विकासासोबत पर्यावरणाचा समतोल राखण्याचे महत्त्व जगासमोर मांडण्यात आले. या परिषदेनंतर संयुक्त राष्ट्रसंघाने ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून घोषित केला. १९७४ पासून या दिवसाचे औपचारिक आयोजन सुरू झाले. तेव्हापासून दरवर्षी विविध देशांमध्ये पर्यावरण संवर्धनाच्या विविध विषयांवर आधारित कार्यक्रम, मोहिमा, परिसंवाद, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान आणि जनजागृती उपक्रम आयोजित केले जातात. या दिवसाचा मुख्य उद्देश लोकांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करणे, पर्यावरणीय समस्यांकडे लक्ष वेधणे आणि पर्यावरण संरक्षणासाठी कृती करण्यास प्रेरित करणे हा आहे.

पर्यावरणाचे महत्त्व समजून घेताना आपण हे लक्षात घेतले पाहिजे की मानव हा निसर्गाचा स्वामी नसून त्याचा एक अविभाज्य घटक आहे. निसर्गातील प्रत्येक घटकाचे विशिष्ट कार्य असते. जंगल कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि प्राणवायू निर्माण करतात. नद्या आणि जलस्रोत मानवाला पाणी उपलब्ध करून देतात. माती अन्नधान्य उत्पादनासाठी आवश्यक असते. विविध प्राणी आणि कीटक परिसंस्थेचे संतुलन राखण्यास मदत करतात. या सर्व घटकांमधील सुसंवादामुळे पृथ्वीवरील जीवन शक्य झाले आहे. परंतु मानवाने आपल्या गरजा आणि सुखसोयी वाढविण्यासाठी निसर्गाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला. परिणामी पर्यावरणीय संतुलन बिघडले आणि आज जग अनेक गंभीर संकटांचा सामना करत आहे.

आजच्या काळातील सर्वात मोठी पर्यावरणीय समस्या म्हणजे हवामान बदल. औद्योगिक क्रांतीनंतर जीवाश्म इंधनांचा वापर प्रचंड प्रमाणात वाढला. कोळसा, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू यांच्या ज्वलनामुळे वातावरणात कार्बन डायऑक्साइड आणि इतर हरितगृह वायूंचे प्रमाण वाढले. हे वायू पृथ्वीभोवती उष्णतेचे आवरण निर्माण करतात आणि त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढते. या प्रक्रियेला जागतिक तापमानवाढ असे म्हणतात. जागतिक तापमानवाढीमुळे हिमनद्या वितळत आहेत, समुद्राची पातळी वाढत आहे, हवामानातील बदल तीव्र होत आहेत आणि नैसर्गिक आपत्तींची संख्या वाढत आहे. जगभरात दुष्काळ, पूर, उष्णतेच्या लाटा, जंगलातील आगी आणि चक्रीवादळे अधिक वारंवार घडू लागली आहेत. हवामान बदलाचा परिणाम केवळ पर्यावरणावरच नव्हे तर शेती, आरोग्य, अर्थव्यवस्था आणि सामाजिक जीवनावरही होत आहे.

जंगल हे पृथ्वीचे फुफ्फुस मानले जाते. जंगलांमुळे वातावरणातील कार्बनचे प्रमाण नियंत्रित राहते, पावसाचे चक्र सुरळीत राहते आणि जैवविविधतेचे संरक्षण होते. पृथ्वीवरील लाखो वनस्पती आणि प्राणी जंगलांमध्ये आश्रय घेतात. परंतु वाढत्या शहरीकरणामुळे, खाणकामामुळे, औद्योगिक प्रकल्पांमुळे आणि विकासकामांमुळे मोठ्या प्रमाणावर जंगलतोड होत आहे. जंगलांचा ऱ्हास झाल्याने वन्यजीवांचे अधिवास नष्ट होत आहेत आणि अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. जंगलतोडीमुळे वातावरणातील कार्बनचे प्रमाण वाढते आणि हवामान बदलाची समस्या अधिक गंभीर बनते. त्यामुळे वृक्षारोपण आणि वनसंवर्धन हे पर्यावरण संरक्षणाचे अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत.

जलसंपदा ही मानवाच्या जीवनासाठी अत्यावश्यक आहे. पाणी नसल्यास जीवन अशक्य आहे. परंतु आज जगभरात जलसंकट तीव्र होत आहे. लोकसंख्या वाढ, औद्योगिकीकरण, शेतीसाठी होणारा अतिवापर आणि पाण्याचे अयोग्य व्यवस्थापन यांमुळे अनेक भागांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. नद्या आणि तलावांमध्ये औद्योगिक सांडपाणी, प्लास्टिक कचरा आणि रासायनिक पदार्थ मिसळल्यामुळे जलप्रदूषण वाढत आहे. भूजलपातळी झपाट्याने खाली जात आहे. भारतातील अनेक राज्यांमध्ये उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण होते. भविष्यात पाणी हे संघर्षाचे प्रमुख कारण ठरू शकते, अशी भीती व्यक्त केली जाते. त्यामुळे जलसंधारण, पावसाचे पाणी साठवणे, जलप्रदूषण नियंत्रण आणि पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे.

वायुप्रदूषण ही आधुनिक जगासमोरील आणखी एक गंभीर समस्या आहे. वाहनांचा धूर, कारखान्यांमधून होणारे उत्सर्जन, वीजनिर्मितीसाठी वापरले जाणारे जीवाश्म इंधन आणि कचरा जाळण्याच्या प्रक्रियेमुळे वातावरणात घातक वायूंचे प्रमाण वाढत आहे. वायुप्रदूषणामुळे दमा, फुफ्फुसांचे आजार, हृदयरोग आणि कर्करोगासारखे गंभीर आजार वाढत आहेत. अनेक महानगरांमध्ये हवेची गुणवत्ता धोकादायक पातळीवर पोहोचली आहे. स्वच्छ हवा ही मानवाचा मूलभूत अधिकार आहे. त्यामुळे स्वच्छ ऊर्जा, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञान यांचा वापर वाढविणे आवश्यक आहे.

प्लास्टिक प्रदूषण हा पर्यावरणासाठी वाढता धोका आहे. प्लास्टिकच्या वापरामुळे अनेक सुविधा निर्माण झाल्या असल्या तरी त्याचे दुष्परिणाम अत्यंत गंभीर आहेत. प्लास्टिक सहज विघटित होत नाही. त्यामुळे ते जमिनीमध्ये, नद्यांमध्ये आणि समुद्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर साचते. समुद्रातील प्लास्टिक कचऱ्यामुळे सागरी जीवांचे मोठे नुकसान होत आहे. अनेक पक्षी आणि प्राणी प्लास्टिक गिळल्यामुळे मृत्युमुखी पडतात. सूक्ष्म प्लास्टिकचे कण आता मानवी शरीरातही प्रवेश करू लागले आहेत. त्यामुळे एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकचा वापर कमी करणे आणि पर्यावरणपूरक पर्यायांचा स्वीकार करणे आवश्यक आहे.

पर्यावरणीय संतुलन टिकविण्यासाठी जैवविविधतेचे संरक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. पृथ्वीवरील वनस्पती, प्राणी आणि सूक्ष्मजीव यांची विविधता म्हणजे जैवविविधता. जैवविविधतेमुळे परिसंस्था कार्यरत राहतात आणि मानवाला अन्न, औषधे, इंधन तसेच इतर अनेक संसाधने उपलब्ध होतात. परंतु अधिवासांचा नाश, प्रदूषण, हवामान बदल आणि नैसर्गिक संसाधनांचे अतिरेकी शोषण यांमुळे अनेक प्रजाती धोक्यात आल्या आहेत. जैवविविधतेचा ऱ्हास हा पर्यावरणीय संकटाचा एक महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे वन्यजीव संरक्षण, अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्यानांचे संवर्धन आवश्यक आहे.

भारत हा जैवविविधतेने समृद्ध देश आहे. हिमालय, पश्चिम घाट, सुंदरबन, ईशान्य भारतातील जंगले आणि राजस्थानचे वाळवंट या विविध परिसंस्था भारतात आढळतात. भारतीय संस्कृतीत निसर्गाला विशेष स्थान आहे. वृक्षपूजन, नदीपूजन आणि प्राण्यांप्रती आदरभाव या परंपरा पर्यावरणपूरक जीवनशैलीचे प्रतीक आहेत. ऋषी-मुनींनी निसर्गाशी सुसंवाद साधून जीवन जगण्याचा संदेश दिला आहे. आजच्या काळात या मूल्यांचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे.

पर्यावरण संरक्षणामध्ये शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पर्यावरण शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण होते. पर्यावरणीय समस्यांची जाणीव, संसाधनांचा योग्य वापर आणि पर्यावरणपूरक सवयी यांचा विकास शिक्षणाद्वारे होतो. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, जलसंधारण आणि कचरा व्यवस्थापन यांसारखे उपक्रम राबविले जातात. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाची भावना विकसित होते.

विज्ञान आणि तंत्रज्ञान पर्यावरण संरक्षणासाठी महत्त्वाचे साधन ठरू शकतात. सौरऊर्जा, पवनऊर्जा, जैवऊर्जा आणि जलऊर्जा यांसारख्या नूतनीकरणक्षम ऊर्जास्रोतांचा वापर वाढविल्यास कार्बन उत्सर्जन कमी करता येते. इलेक्ट्रिक वाहने, ऊर्जा कार्यक्षम उपकरणे, हरित इमारती आणि स्मार्ट तंत्रज्ञान यांचा वापर पर्यावरण संरक्षणासाठी उपयुक्त आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास विकास आणि पर्यावरण संवर्धन यांचा समतोल राखता येऊ शकतो.

कचरा व्यवस्थापन हा पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वाचा भाग आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे आणि उपभोगवादी जीवनशैलीमुळे कचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. योग्य व्यवस्थापन न झाल्यास कचरा पर्यावरणासाठी गंभीर धोका निर्माण करतो. घरगुती स्तरावर कचऱ्याचे वर्गीकरण, पुनर्वापर, पुनर्निर्मिती आणि सेंद्रिय कचऱ्यापासून खत निर्मिती यांसारख्या उपाययोजना प्रभावी ठरू शकतात. 'कमी वापरा, पुनर्वापर करा आणि पुनर्निर्मिती करा' हे तत्त्व पर्यावरण संरक्षणासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

शेती आणि पर्यावरण यांचा घनिष्ठ संबंध आहे. रासायनिक खते आणि कीटकनाशकांच्या अतिरेकी वापरामुळे जमिनीची सुपीकता कमी होत आहे. जलप्रदूषण वाढत आहे आणि जैवविविधतेवर परिणाम होत आहे. सेंद्रिय शेती, नैसर्गिक शेती आणि शाश्वत कृषी पद्धती पर्यावरण संवर्धनासाठी उपयुक्त ठरतात. जलसंधारण, मृदसंवर्धन आणि स्थानिक संसाधनांचा योग्य वापर यांमुळे शेती अधिक शाश्वत बनू शकते.

पर्यावरण संरक्षणासाठी शासन, उद्योग, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांचे संयुक्त प्रयत्न आवश्यक आहेत. विविध कायदे, धोरणे आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचे प्रयत्न सुरू आहेत. परंतु केवळ सरकारी यंत्रणांवर अवलंबून राहून चालणार नाही. प्रत्येक नागरिकाने पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे आवश्यक आहे. पाणी वाचवणे, वीज बचत करणे, झाडे लावणे, सार्वजनिक वाहतुकीचा वापर करणे आणि प्लास्टिकचा वापर टाळणे यांसारख्या छोट्या कृती मोठा बदल घडवू शकतात.

शाश्वत विकास ही आजच्या काळातील सर्वात महत्त्वाची संकल्पना आहे. वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम होणार नाही, अशा प्रकारे विकास करणे म्हणजे शाश्वत विकास होय. आर्थिक प्रगती आणि पर्यावरण संवर्धन यांचा समतोल राखणे ही काळाची गरज आहे. पर्यावरणीय न्याय, संसाधनांचे समान वाटप आणि हरित विकास या संकल्पनांवर भर देणे आवश्यक आहे.

पर्यावरणीय संकटे ही कोणत्याही एका देशापुरती मर्यादित नाहीत. हवामान बदल, प्रदूषण आणि जैवविविधतेचा ऱ्हास या समस्या जागतिक स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि सामूहिक प्रयत्न आवश्यक आहेत. विकसित आणि विकसनशील देशांनी समान जबाबदारी स्वीकारून पर्यावरण संरक्षणासाठी कार्य करणे गरजेचे आहे.

जागतिक पर्यावरण दिन हा आपल्याला एक महत्त्वपूर्ण संदेश देतो की पृथ्वी ही केवळ आपल्या पिढीची मालमत्ता नाही. ती भावी पिढ्यांसाठी जपण्याची अमूल्य ठेव आहे. पर्यावरणाचे रक्षण करणे म्हणजे भविष्याचे रक्षण करणे होय. प्रत्येक झाड, प्रत्येक नदी, प्रत्येक सजीव आणि प्रत्येक नैसर्गिक संसाधन पृथ्वीच्या अस्तित्वासाठी महत्त्वाचे आहे. पर्यावरण संवर्धन ही केवळ जबाबदारी नाही तर मानवतेप्रती असलेली नैतिक बांधिलकी आहे.

आजच्या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आपण सर्वांनी पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्याचा, नैसर्गिक संसाधनांचा जबाबदारीने वापर करण्याचा आणि पृथ्वीला अधिक हरित, स्वच्छ व सुरक्षित बनविण्याचा दृढ संकल्प करणे आवश्यक आहे. पर्यावरणाचे रक्षण ही केवळ शासनाची किंवा काही संस्थांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. आपल्या छोट्या-छोट्या कृतींमधून मोठा बदल घडू शकतो. निसर्गाशी सुसंवाद साधून, शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारून आणि पर्यावरण संवर्धनाला जीवनाचा अविभाज्य भाग बनवूनच आपण उज्ज्वल, सुरक्षित आणि समृद्ध भविष्याची निर्मिती करू शकतो. म्हणूनच या जागतिक पर्यावरण दिनी एकच संदेश सर्वत्र पोहोचला पाहिजे तो म्हणजे ङ्गपर्यावरण वाचवा, पृथ्वी वाचवा आणि मानवजातीचे भविष्य सुरक्षित करा.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# बदलत्या काळातील पर्यावरण

'कुठलीही मानवी समस्या कधीही कायमची सुटू नये हा जीवनाचा अलिखित नियमच आहे. दरवर्षी आपण ५ जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून साजरा करतो. आजच्या समस्या आपल्याला सुटल्यासारख्या वाटतात, पण त्या सुटतात उद्याच्या नवीन समस्यांना जन्म देऊन,' हे उद्गार आहेत, वि. स. खांडेकरांचे. विशेष म्हणजे हे विधान पर्यावरण व मानव यांच्या संदर्भात तंतोतंत लागू पडते. पर्यावरणाची गुणवत्ता वाढवणे, समस्या व संवर्धनाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि पर्यावरणविषयक निर्णय घेण्याची क्षमता निर्माण व्हावी म्हणून पोषक वातावरणाची निर्मिती करणे, हा पर्यावरण दिन साजरा करण्यामागचा मुख्य हेतू आहे. पर्यावरण हा शब्द मूळ फ्रेंच शब्द या शब्दापासून तयार झाला आहे. एहन्नीदह म्हणजे सजीव-निर्जीव यांच्यामधील क्रिया-प्रतिक्रिया व आंतरक्रियांमधून साकार झालेली सजीवाच्या सभोवतालची परिस्थिती म्हणजे पर्यावरण होय. पहिल्या महायुद्धानंतर मानवाच्या निसर्गावरील आघाताचे परिणाम शास्त्रज्ञांच्या लक्षात आले. त्याचप्रमाणे औद्योगिक क्रांतीच्या फळांबरोबर त्याचे दूरगामी गंभीर परिणाम मानवाला भेडसावू लागले. म्हणून इ. स. १९६० मध्ये पर्यावरणशास्त्र किंवा पर्यावरण विज्ञान हे विषय अभ्यासासाठी स्वतंत्रपणे लागू करण्यात आले.

मानव हा पर्यावरणाचाच एक कुशाग्र घटक आहे. मात्र पर्यावरणाच्या प्रत्येक घटकात मानवी हस्तक्षेप वाढत चालला आहे. म्हणून पर्यावरणीय आपत्तीचे शास्त्रीय पद्धतीने अध्ययन व त्यावर परिणामकारक उपाययोजना करण्यासाठी शिक्षण महत्त्वपूर्ण बनले आहे. आज आपण पर्यावरणाचा अभ्यास तीन भागात करत आहोत : पर्यावरण विज्ञान, पर्यावरण शिक्षण आणि पर्यावरण तंत्रज्ञान.

पर्यावरण विज्ञान- यामध्ये तत्त्व, सिद्धांत व जैविक-अजैविक घटकांमधील आंतरक्रियांचा अभ्यास आपण करत आहोत. पर्यावरण शिक्षणात परिसंस्था- रचना, कार्य, संरक्षण व संवर्धन, जैवविविधता, प्रदूषण, पर्यावरणीय आपत्ती-मानवी व नैसर्गिक, जैवलोकसंख्या, पर्यावरणाचा धारणक्षम निरंतर शाश्वत विकास आणि पर्यावरणीय संस्थांच्या भूमिका व कार्याचा ऊहापोह आपण या अभ्यासात करत आहोत. यामध्ये मृदावरण, जीवावरण, जलावरण व वातावरण या सर्व घटकांचाही समावेश आहे. पर्यावरणाच्या अभियांत्रिकी शाखांमधून पर्यावरणातील विविध तत्त्व, संबोधक आणि सिद्धांतासोबतच विविध पर्यावरणातील घटकांचे विश्लेषण, तत्त्वज्ञानाचे उपयोजन आणि पर्यावरण संरक्षण व संधारणासाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा, या संदर्भात मार्गदर्शन केले जाते. जॉर्ज पर्किन व मर्श यांनी त्यांच्या 'मॅन अँड नेचर' या पुस्तकात (१९०७) मानव व नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर व त्याचे विपरीत परिणाम यावर चर्चा केली आहे. त्यांचे हे पुस्तक पर्यावरण शिक्षण देणारे पहिले पुस्तक ठरते. १८९९ मध्ये पॅट्रिक गेडेस यांनी 'द आऊटलूक टॉक' या नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेचे कार्य 'पर्यावरण शिक्षण सुधारणा' असे होते. पर्यावरण शिक्षणातून जाणीव, जागृती करून पर्यावरणाचा ऱ्हास थांबवणे यासाठी १९६५ मध्ये पर्यावरण शिक्षण हा विषय शिक्षणशास्त्रात समाविष्ट करण्यात आला, तर १९७० मध्ये पॅरिस येथे भरलेल्या पहिल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत शालेय शिक्षणात पर्यावरण शिक्षणावर भर देण्यात आला. जून १९७२ मध्ये स्टॉकहोम येथे भरलेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण परिषदेत जागतिक पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी मानवाचीच असल्याचे म्हटले आहे आणि त्यानुसार आंतरराष्ट्रीय पर्यावरण शिक्षण कार्यक्रम अमलात आणला व त्याची उद्दिष्टे ऑक्टोबर १९७५ मध्ये बेलग्रेड येथील कृतिसत्रात ठरविण्यात आली. आज पर्यावरण शिक्षणातील जागरूकता, ज्ञान, दृष्टिकोन, कौशल्य आणि सहभाग ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार (१८ डिसेंबर २००३) पर्यावरण शिक्षणाचा आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर आराखडय़ात प्रत्येक शालेय स्तरावर पर्यावरण शिक्षणाची उद्दिष्टे व पाठय़क्रम ठरविण्यात आले आहेत. आपल्या देशात आज अनेक विद्यापीठांमधून पर्यावरणशास्त्र, पर्यावरण शिक्षण आणि पर्यावरण अभियांत्रिकीविषयक पदवी, पदव्युत्तर आणि डॉक्टरेट स्तरावरील अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. या सर्व कोर्सेसची आणि महाविद्यालये व विद्यापीठांची माहिती http://www.schlorashipsindia.com/environmental.html या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. पर्यावरण विषयातून पदवी, पदव्युत्तर आणि डॉक्टरेट मिळवलेल्या व्यक्तींना औद्योगिक संस्था, सामाजिक संस्था, पत्रकारिता, इतकेच नव्हे तर मॉडेलिंग क्षेत्रातसुद्धा चांगल्या संधी उपलब्ध आहेत. जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने एवढेच सांगावेसे वाटते की, आज पर्यावरणविषयक जाणिवांच्या निर्मितीबरोबरच शालेय शिक्षणात पर्यावरण संरक्षण आणि पर्यावरण संधारण यावर जास्त भर द्यावा लागणार आहे. सध्या गरज प्रत्यक्ष कृती करण्याची आहे. कारण कोणताही विकास हा पर्यावरणातील बदलांशी संबंधित आहे.मनुष्य हा निसर्गाचाच एक घटक आहे आणि ऊर्जा बचत, पाणी बचत, वीज बचत, परिसर स्वच्छता अपरिहार्य आहे. हा संस्कार शालेय स्तरावर पर्यावरण शिक्षणातून करता आला तरी पुरेसे आहे.

**– नरेंद्र देशमुख**

होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र

## जागतिक पर्यावरण दिन

पर्यावरणाची गुणवत्ता उंचावणे,पर्यावरणातील समस्या निवारण करणे, पर्यावरण संवर्धन, संरक्षण,व संगोपन या बाबत जागरूकता निर्माण व्हावी,सर्व नागरिकांनी पर्यावरण बाबत जागरूक होऊन मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करावे,सिमेंट जंगले बांधणे थांबवावे, वाळू उपसे, प्रमाणाबाहेर करणे थांबवावे, वृक्ष कत्तल थांबवावी, परिसर स्वच्छता करावी, प्लास्टिक वापर थांबवावा, पाण्याचे महत्व जाणून पावसाचे पाणी अडवावे, छतावरील पाण्याचे पुनर्भरण करावे, जंगलातील पशु, पक्षी, जंगली जनावरे यांची शिकार थांबवाबी, आणि वसुंधरेवरील सर्व प्रकारचे आघात थांबवावे हे सर्व समजून घेऊन या प्रमाणे आचरण ठेऊन निसर्ग जपावा हे समजून घेण्यासाठी दरवर्षी पांच जून हा जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो.

माणूस हा पर्यावरणचा एक बुद्धिमान घटक आहे, मात्र या मानवांचा पर्यावरणाच्या प्रत्येक घटकात मानवी हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने पर्यावरण ही या मानवी हस्तक्षेपाला विविध प्रकारच्या मार्गांनी धडा शिकवीत आहे, व माणूस त्याचे परिणाम स्वतः भोगत आहे ,व त्याचे परिणाम पर्यावरणातील ईतर घटकांना ही भोगायला भाग पाडत आहे.जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने जगातील सर्व मानव घटकांनी पर्यावरण संरक्षण व पर्यावरण संधारण यावर जास्त भर देऊन पर्यावरण जागृतीची गरज आहे. यासाठी शालेय शिक्षण स्तरावर पर्यावरण संरक्षण बाबत सर्वंकष प्रयत्न व्हावयास पाहिजे.मानव हा निसर्गाचा महत्वपूर्ण घटक आहे,जगातील मानवांनी वृक्षारोपण, पाणी बचत,ऊर्जा बचत, वीज बचत परिसर स्वच्छता या सर्व बाबी अंगी बानवून,इतरांनाही याचे महत्व सांगून त्यांनाही या बाबी पाळण्यास लावणे गरजेचे आहे.पर्यावरण शिक्षण ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे.नागरिक व शालेय विद्यार्थी यांनी एकसंघ राहून देशात पर्यावरण गुणवत्ता विकसित करावी, जनतेमध्ये पर्यावरण संरक्षण, संवर्धन, संगोपन व संधारण उर्मी वाढवून पर्यावरण घटक राखून, आणखी वृद्धीपित होण्यासाठी सर्वंकष व सांघिक प्रयत्न झाले तर उद्याचा काळ हा मानवप्राणी, पशु, पक्षी व इतर सर्व सजीवांसाठी आरोग्यदायी राहील.

**– धोंडीरामसिंह राजपूत**

## निसर्ग जपू या

निसर्गातील सामुग्री जीवापाड जपू या आपण सारे,सारे निरोगी जगू या
नद्या आणि ओढे डोंगर आणि दरे हेच आपले असती मित्र खरे,खरे
झाडे आणि झुडपे पशु आणि पक्षी हेच आपले जीवन सुरक्षित रक्षी
दगड आणि धोंडे वाळू आणि माती हेच आपल्या जीवनाचे खरे साथी
स्वच्छतेचा पाठ आपण गिरवू या थेंब,थेंब पाणी आपण साचऊ या
निसर्गासंगे जगू निसर्गासंगे राहू निरोगी जीवनाचे पाठ गिरवू

**– .धोंडीरामसिंह राजपूत**

## रेल्वे स्टेशन चौक परिसरातील अज्ञात मृत व्यक्तीच्या वारसांचा शोध; ओळख पटविण्यासाठी आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. ४ (प्रतिनिधी)- रेल्वे स्टेशन चौक आऊट गेट सिग्नल येथील



रोड डिव्हायडरवर बेशुद्ध अवस्थेत आढळलेल्या एका अनोळखी व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. याप्रकरणी वेदांत नगर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पोलिसांनी या अज्ञात मृत व्यक्तीच्या वारसांचा शोध घेण्यासाठी नागरिकांना माहिती देण्याचे आवाहन केले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १७ मे २०२६ रोजी रेल्वे स्टेशन चौक परिसरातील रोड डिव्हायडरवर वय अंदाजे ५० ते ५५ वर्षे असलेला एक इसम बेशुद्ध अवस्थेत आढळून आला होता. त्याला तातडीने उपचारासाठी घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी अंती त्याला मृत घोषित केले. या मृत व्यक्तीचे वर्णन मध्ये वय अंदाजे ५० ते ५५ वर्षे.उंची अंदाजे ५ फूट.

रंग काळा-सावळा.

चेहरा लांबट गोल, नाक सरळ, डोळे काळे, डोक्यावर टक्कल आहे.अंगावरील कपडे: निळ्या रंगाचे जॅकेट आणि राखाडी (ग्रे) रंगाची पँट.या वर्णनाच्या व्यक्तीबाबत किंवा त्याच्या नातेवाईकांबाबत काहीही माहिती मिळाल्यास तातडीने वेदांत नगर पोलीस ठाणे किंवा सहायक फौजदार एन. डी. गुजर (मोबाईल क्र. ९९२३२४९७९२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## पथदर्शी प्रकल्पः मोबाईल ॲपद्वारे खत वितरण; तक्रार निवारणासाठी तालुकानिहाय हेल्पलाईन सुविधा

छत्रपती संभाजीनगर, दि. ४ (प्रतिनिधी) - राष्ट्रीय खत विक्री आराखड्यानुसार मोबाईल ॲपद्वारे खत नोंदणी व वितरण करण्यासाठी 'फ्रेमवर्क फॉर फर्टीलायझर सेल', चा पथदर्शी प्रकल्प छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात राबविला जात आहे. शुक्रवार दि.५ पासून हा प्रकल्प कार्यान्वित होत आहे. याबाबत शेतकऱ्यांना काही तक्रार, अडीअडचणी वा शंकानिरसन करावयाचे असल्यास त्यासाठी तालुकानिहाय अधिकाऱ्यांची नियुक्ती करुन हेल्पलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी व जिल्हा कृषी विकास अधिकारी प्रकाश पाटील यांनी कळविले आहे.

शेतकऱ्यांनी आपल्या तालुकानिहाय नेमलेल्या अधिकाऱ्यांशी त्यांच्या संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा,असेही आवाहन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारी, अडीअडचणी निवारणासाठी नियुक्त अधिकारी व त्यांचे संपर्क क्रमांक याप्रमाणे-

जिल्हास्तरीय हेल्पलाईन- पंकज अण्णासाहेब ताजणे-९४०४३०३१२८, हरिभाऊ सिताराम कातोरे- ९१८५२२०४३५, तालुकास्तरीय हेल्पलाईन- छत्रपती संभाजीनगर- गोविंद राम किशन पौळ-९७६३७१५०४, दिनकर आनंदराव जाधव-९४२१३११४१२. पैठण- राधाकृष्ण लक्ष्मण कार्ले-९४२२२२९८१८, संतोष अर्जून जाधव-९८५०१८१६२३.

फुलंब्री- शांतिलाल दामोधर हिवराळे-७५८८७९३०३५, रामराव मारोतराव बेम्बरे-८८३०४५२७०७, वैजापूर- रविंद्र अशोक उराडे-९४२०४९०३७६,जगदीप ज्ञानबा वाघमारे-७५८८०८९६७४, गंगापूर- प्राजक्ता संजय रणसिंग-७०२८३७१७७१,अजय पुरुषोत्तम गवळी-७५८८८१२४२४, खुलताबाद- काकासाहेब नवनाथ इंगळे-९६६५६०६५७८, हणमंत रामा बोयनर-९४२३८४४७१२, सिल्लोड- गजानन लक्ष्मण कुडके-९४०४६९३८५१, सुनील सर्जेराव सूर्यवंशी-९५११६६९६६५, कन्नड- मनोजकुमार पंडीत सैंदाणे-९४०४६८०४२४,विश्वास गोपाळराव अधापुरे-८२७५२४३९०५. सोयगाव- रमेश ग्यानोबा गुंडीले-९४२२२२९९१९, संतोष वैजनाथ भालेराव-९६५७३४४९१४.

त्या त्या तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोबाईल ॲपद्वारे खते मिळवण्याबाबत येणाऱ्या अडचणी, शंका निरसनासाठी संबंधित तालुक्यातील अधिकाऱ्यांशी दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

## जी.डी.सी.ए. व सी.एच.एम. परीक्षेचे गुणपत्रक, प्रमाणपत्र परीक्षार्थीने हस्तगत करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. ४ (प्रतिनिधी) - सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे यांच्यामार्फत दिनांक २३, २४ व २५ मे २०२५ रोजी जी.डी.सी.आणि सी.एच.एम. परीक्षा २०२५ देवगिरी महाविद्यालय येथे ही परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र जिल्हा उपनिबंधक कार्यालयाला प्राप्त झाले आहेत.

परीक्षार्थींनी आपली गुणपत्रके व प्रमाणपत्रे दिनांक ३० जून २०२६ पर्यंत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर कार्यालयात स्वतः समक्ष हजर राहून हस्तगत करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

यासोबतच, ज्या विद्यार्थ्यांनी सन २०२२, २०२३ व २०२४ मधील परीक्षेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र अद्याप कार्यालयात येऊन नेलेले नाही, अशा सर्व विद्यार्थ्यांनी देखील तात्काळ कार्यालयात समक्ष येऊन आपली प्रमाणपत्रे हस्तगत करावीत, असे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर कार्यालयाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## छत्रपती संभाजीनगर विभागात' दर्जेदार कृषि निविष्ठा वेळेत मिळण्यासाठी भरारी पथके' सज्ज

छत्रपती संभाजीनगर, दि. ४ (प्रतिनिधी) -खरीप हंगाम २०२६-२७ मध्ये शेतकऱ्यांना बियाणे, खते आणि औषधे योग्य दरात व वेळेत मिळण्यासाठी कृषी विभागाने नियोजन केले आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांसाठी 'विभागीय भरारी पथके' स्थापन करण्यात आली असून, तंत्र अधिकारी श्री. ए. एल. काळुशे यांच्याकडे 'पथक प्रमुख' म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.पी. ए ताजने हे मोहीम अधिकारी, आणि एच. एस कातोरे. जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय हे पथकातील सदस्य असून एस. जी. बंडगर विभागीय गुणनियंत्रण य निरीक्षक हे सदस्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

कृषी निविष्ठांची साठेबाजी, जादा दराने विक्री किंवा कोणताही गैरप्रकार आढळल्यास संबंधित विक्रेत्यांचे परवाने तात्काळ रद्द केले जातील. तसेच गंभीर स्वरूपाच्या गैरव्यवहारांसाठी दोषींवर थेट फौजदारी (क्रिमिनल) गुन्हे दाखल करण्याचे कडक आदेश देण्यात आले आहेत.

**तक्रार निवारण कक्ष स्थापन** - कृषी निविष्ठांच्या गुणवत्ता व पुरवठ्याच्या अनुषंगाने खरीप हंगामात शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणीचे तात्काळ निराकरण करण्यासाठी विभाग स्तरावर तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. ९४२१२३३२७० या मोबाइल क्रमांक तसेच १८००२३३४००० टोल फ्री संपर्क क्रमांकावर शेतकऱ्यांनी निविष्ठा उपलब्धता, अडचणी, तक्रारीबाबत संपर्क करावा. असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक श्री सुनील वानखेडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# रेल्वेत विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून १.७२ कोटी रुपये वसूल केला दंड

नांदेड, दि. ४ (प्रतिनिधी) - दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने मे -२०२६ महिन्यात तिकीट तपासणी मोहिमांमध्ये अभूतपूर्व यश संपादन करत विभागाच्या इतिहासातील सर्वकालीन सर्वोत्तम मासिक कामगिरीची नोंद केली आहे. सघन तिकीट तपासणी मोहीमा, प्रभावी नियोजन आणि तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांच्या समर्पित प्रयत्नांमुळे विभागाने रेल्वे महसूल संरक्षण, प्रवासी शिस्त आणि सेवा गुणवत्तेच्या क्षेत्रात नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.

मे-२०२६ दरम्यान विभागातील विविध रेल्वे गाड्या व स्थानकांवर व्यापक तिकीट तपासणी करण्यात आली. या सातत्यपूर्ण तपासणी मोहिमांमुळे एकूण २८,९४४ विनातिकीट व अनियमित प्रवासाची प्रकरणे आढळून आली. त्यातून १,७२,८५,४६० इतका विक्रमी महसूल रेल्वेला प्राप्त झाला. नांदेड विभागाच्या इतिहासात एका महिन्यात तिकीट तपासणीद्वारे मिळालेला हा सर्वाधिक महसूल असून, विभागाच्या महसूल संरक्षण उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीचे हे द्योतक आहे. प्रवाशांमध्ये अधिक जागरूकता निर्माण करण्यासाठी तसेच प्रवास नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करण्यासाठी विभागात विशेष तिकीट तपासणी मोहिमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये खालील मोहिमांचा समावेश होता :

०३ भव्य तिकीट तपासणी मोहीमा
०१ मेजीसस्ट्रेट विशेष तपासणी मोहीम
१८ फोर्ट्रेस तपासणी मोहीमा

या व्यापक तिकीट तपासणी व अंमलबजावणी मोहिमांच्या यशामध्ये ३३ तिकीट तपासणी पथक कर्मचारी, १७४ अमेनिटी कर्मचारी आणि १८ स्टेशनरी कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. तसेच या मोहिमा रेल्वे सुरक्षा बल (RPF) यांच्या समन्वयाने प्रभावीपणे राबविण्यात आल्या. महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांवर आणि प्रमुख रेल्वे गाड्यांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या विशेष मोहिमांमुळे विनातिकीट व अनियमित प्रवासाच्या प्रकरणांचा शोध घेणे, महसूल गळती रोखणे आणि अनधिकृत प्रवासाला आळा घालणे अधिक प्रभावीपणे शक्य झाले.

तिकीट तपासणी मोहिमांचा उद्देश केवळ महसूलवाढ नसून, वैध तिकीट खरेदी करून प्रवास करणाऱ्या प्रामाणिक प्रवाशांना सुरक्षित, आरामदायी आणि विनाअडथळा प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देणे हा त्यामागील प्रमुख हेतू आहे. विनातिकीट प्रवास, आरक्षित डब्यांमधील अनधिकृत प्रवास आणि इतर प्रवासातील अनियमितता रोखल्यामुळे डब्यांमधील गर्दी कमी होण्यास मदत होते. तसेच प्रवाशांची सुरक्षा वाढते, प्रवासातील शिस्त कायम राहते आणि एकूणच प्रवासाचा दर्जा सुधारतो. या मोहिमांमुळे रेल्वेच्या सुविधांचा योग्य व न्याय्य लाभ खऱ्या प्रवाशांना मिळण्यास मदत होते. नांदेड विभाग रेल्वे महसूलाचे संरक्षण, प्रवासातील शिस्तीचे पालन आणि प्रवासी सेवांमध्ये सातत्याने सुधारणा करण्यासाठी कटिबद्ध आहे. सर्व रेल्वे प्रवाशांनी वैध तिकीटासह प्रवास करावा तसेच सुरक्षित, शिस्तबद्ध आणि प्रवासीहितैषी रेल्वे व्यवस्था राखण्यासाठी रेल्वे प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# इनव्हायरमेंट प्रोटेक्शन विंग स्थापना करून जागतिक पर्यावरण दिन शासनाने साजरा करावा- डॉ. राजेंद्र दाते पाटील

छत्रपती संभाजीनगर, दि. ४ (प्रतिनिधी)- आपल्या या अद्भुत ग्रहाचे रक्षण करण्यासाठी क्षणभर थांबून विचार करण्या साठी आणि कृती करण्यासाठी, दरवर्षी ५ जून रोजी 'जागतिक पर्यावरण दिन' साजरा केला जातो परंतु वैयक्तिक जबाबदारीचे भान ओळखूनच जागतिक पर्यावरण दिन साजरा व्हावा असे प्रतिपादन आमच्या प्रतिनिधी सोबत बोलतांना जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी केले.

पुढे बोलतांना ते म्हणाले की,पर्यावरण दिन हा पर्यावरणाशी संबंधित जगातील सर्वात मोठ्या जागतिक कार्यक्रमांपैकी एक आहे. हा दिवस आपल्या ग्रहाला भेडसावणाऱ्या पर्यावरणीय समस्यांना जगासमोर आणण्या साठी एक व्यासपीठ म्हणून कार्य करतो. म्हणून आता २०२६ ची शास्वात संकल्पना तयार करून ती अंमलात आणण्याचा ' संकल्प ' शासनाने सर्व सेवाभावी संस्था,शिक्षण संस्था, युवा वर्ग आणि सर्व स्थरातील विद्यार्थी व नागरिकांच्या मदतीने करावा. 'जागतिक पर्यावरण दिन २०२६', हवामान बदल आणि हवामानविषयक कृतींना गती देण्यावर लक्ष केंद्रित करेल असा उद्देश निश्चित करून २०२६ ची ही संकल्पना हवामान बदलावर आधारित ठेऊन, एका न्याय्य आणि शाश्वत भविष्याची खात्री निर्माण करण्यासाठी आर्थिक व्यवस्थांचा पुनर्विचार करण्यावर आणि हवेच्या पर्यावरणाशी असलेले आपले नाते सुधारण्यावर कृती कार्यक्रम आखला पाहिजे.

**जागतिक पर्यावरण दिनाचा इतिहास**

जागतिक पर्यावरण दिन १९७२ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने सुरू केला. हा दिवस गंभीर पर्यावरणीय समस्यां विषयी जागृती निर्माण करण्यासाठी आणि जागतिक स्तरावर कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून स्थापित करण्यात आला. या बाबतची पहिली बैठक १९७२ मध्ये स्वीडन मधील स्टॉकहोम येथे पार पडली, जिथे या विषयावर सखोल चर्चा आणि विचारमंथन करण्यात आले. तेव्हापासून- १९७३ पासून, हा दिवस त्याच तारखेला साजरा करण्याची परंपरा अविरतपणे सुरू झालेली असुन जागतिक पर्यावरण दिनाचे

महत्त्व जागतिक पर्यावरण दिन विविध पर्यावरणीय समस्यांना जगासमोर आणतो, कृतीची तयारी करतो आणि पर्यावरणीय शाश्वततेला प्रोत्साहन देतो. विविध मोहिमा, कार्यक्रम आणि उपक्रमां च्या माध्यमातून, जागतिक पर्यावरण दिन लोकांना आणि समुदायांना बदल घडवून आणण्यासाठी प्रेरित करणे हाच उद्देश शासन स्तरावर मोठ्या प्रमाणावर घेऊन अति शाश्वत भविष्यासाठीपर्यावरणीय आव्हानांचा सामना करण्याची आणि त्यांवर कृती करण्याची उर्मी लोकांमध्ये जागृत करण्याचा संकल्प

शासनानेचे सेवाभावी संस्था व पर्यावरण क्षेत्रातील महनीय व्यक्ती यांच्या सहकार्याने हाती घेणे खुप महत्वाचे असल्याचे मत जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जलतज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केले असुन जागतिक पर्यावरण दिन आणि वैयक्तिक जबाबदारी याची सांगड घालण्याची गरज त्यांनी पुढे आणली असुन जागतिक पर्यावरण दिन २०२६ चे हवामान बदलावर आणि हवामान विषयक कृतींना गती देण्यावर भर देऊन सध्याच्या काळात अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केले असुन याचे मुख्य कारण म्हणजे जगाला भेडसावणारी अनेक गंभीर पर्यावरणीय आव्हाने-नापीक झालेल्या जमिनींचे पुनरुज्जीवन केल्याने कार्बन शोषण्यास, वातावरणातील हरितगृह वायू कमी करण्यास आणि हवामान बदलाचे परिणाम कमी करण्यास मदत होणार असुन दुष्काळाचा सामना करण्याची क्षमता जर वाढविली तरच पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करता येणार असुन त्यासाठी ' थ्री आर ' पॅटर्न अंमलात आणण्यावर उपाय योजना करण्यावर जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जलतज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी भर दिला असुन शेती,पिण्यासाठी आणि उद्योगासाठी आणि मानवी वापरासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरलेला वापर असुन अशा वेळी जेव्हा हवामान बदलामुळे दुष्काळाची वारंवारता आणि तीव्रता वाढते तेव्हाच पुनर्संचयित परिसंस्था विविध प्रजातींसाठी अधिवास प्रदान करण्याची गरज जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी प्रतिपादित केली असून याच बाबी भविष्यात जैवविविधतेला प्रोत्साहन देतील आणि जमिनीचा ऱ्हास रोखून जैव विविधतेच्या 'हॉटस्पॉटब सना' नापीक आणि निर्जीव होण्यापासून वाचवतील असेही ते म्हणाले. अन्न सुरक्षेच्या महत्वाच्या विषयावर बोलतांना डॉ राजेंद्र दाते पाटील म्हणाले की, सुपीक माती आणि पुनर्संचयित जमिनी कृषी उत्पादकते साठी अत्यावश्यक आहेत आणि वाळवंटी करण व दुष्काळ रोखल्यास वाढत्या लोकसंख्येसाठी अन्नाचा स्थिर पुरवठा सुनिश्चित करणे तेव्हाच सोपे होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त करतांना ते म्हणाले की,आपल्या सर्वांना माहीत आहे की, जमिनीच्या ऱ्हासामुळे शेती, वनीकरण आणि पर्यटन क्षेत्रात आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणावर होत असुन आणि पुनरुज्जीवन प्रकल्प रोजगार निर्माण करण्यावर आपली अप्रमाणिक कृती नियोजीत केल्यास अधिक शाश्वत आर्थिक वाढ होऊ शकते असेही प्रतिपादन करून पुढे ते म्हणाले की, निरोगी परिसंस्था स्वच्छ हवा, पाणी, घन कचरा व्यवस्थापन, वैद्यकीय कचरा, लोखंडी कचरा, इ वेस्ट आणि एकूणच पर्यावरणाच्या ऱ्हासास कारणीभूत ठरत असुन गुणवत्तेत योगदान देतील असे कृती कार्यक्रम हाती घेण्यावर भर देण्याची महत्वाची गरज जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी नमुद करून जे की, मानवी आरोग्यासाठी अत्यावश्यक असल्याचे नमुद करून ते पुढे म्हणाले की, लवचिक भूदृश्ये पूर आणि भूस्खलन यांसारख्या नैसर्गिक आपत्तींचा धोका कमी करण्याचे स्रोत निर्माण करण्याची गरज नमुद करतांना जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी जन समुदायांवर अत्यन्त विनाशकारी परिणाम होऊ शकतात असेही त्यांनी स्पष्टपणे सांगितले. यासाठी आता वैयक्तिक जबाबदारी निश्चित करून शाश्वत पद्धतींचा अवलंब करण्यावर त्यांनी भर दिला असुन कमी करा, पुन्हा वापरा, पुनर्वापर करा या 'थ्री आर' पद्धतीचे सूत्र जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी त्यांच्या इन्स्टिटयूट ऑफ अँपरोप्रिएट अँड सस्टेनेबल टेक्नॉलॉजी या संस्थेच्या वतीने आंतर राष्ट्रीय कीर्तीचे सायंटिस्ट प्रा डॉ आर बी चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली तयार केलेल्या संशोधन असलेल्या पॉवर पॉईट प्रेझेंटेशन मध्ये संशोधनात्मक सविस्तर माहिती तयार केलेली आहे हेच तयार करण्यात आलेले पॉवर पॉईट प्रेझेंटेशन खुप उपयुक्त ठरणार असल्याचे जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी स्पष्ट केले.

**सर्वच कचरा कमी करणे**

शाश्वत वापर- स्थानिक पातळीवर उपलब्ध, शाश्वत आणि सेंद्रिय उत्पादने निवडल्याने उत्पादन आणि वाहतुकीचा पर्यावरणा वरील परिणाम कमी करता येऊ शकतो त्यासाठी ट्रॅफिक व्यवस्थापन, सिग्नल व्यवस्थापन, रस्ते व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन ज्यात ग्रे वॉटर, ब्लॅक वॉटर व पोटेबल वॉटर व्यवस्थापन त्यांच्या 'स्मार्ट सिटी' या विषयावरील अत्यन्त अभ्यासू 'पॉवर पॉईट प्रेझेंटेशन' दिशादर्शक ठरणार असल्याचे स्पष्ट मत जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी स्पष्ट केले. पुनर्वनीकरण आणि पुनर्संचयन प्रकल्पांना भविष्यात पाठिंबा देणे अत्यन्त महत्वाचे ठरणार असुन स्थानिक पातळीवर विद्यार्थी, युवावर्ग, सेवाभावी संस्था-संघटना आदींच्या मदतीने वृक्षारोपण उपक्रमां मध्ये सहभागी करून घेण्यावर आता राजकीय पक्ष संघटना यांनी स्वतःचे एक

' इनव्हायरमेंट प्रोटेक्शन विंग' तयार करून राजकीय प्रगल्भता मानव जातीच्या कल्याणा साठी निर्माण करून भूमी पुनर्संचयनावर काम करणाऱ्या संस्थांना आता पाठिंबा द्यावा लागणार असल्याचे मत जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी स्पष्ट केले असुन स्थानिक भूदृश्ये आणि परिसंस्था पुनर्संचयित करण्याच्या उद्देशाने असलेल्या सामुदायिक प्रकल्पांमध्ये सर्वांनी सहभागी होण्यावर त्यांनी भर दिला असुन ऊर्जा-कार्यक्षम उपकरणे वापरणे आणिअक्षय ऊर्जा स्रोतांची निवड करणे. वैयक्तिक वाहनांतून होणारे कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्यासाठी शासनाच्या वरिष्ठ अधिकारी, लोक प्रतिनिधी, विविध समाज सेवक, राजकीय पक्षांचे नेते पदाधिकारी यांनी आठवड्या तून एकदा विना वाहन ज्यात दुचाकी व चारचाकी वाहने यांचा वापर न करता सायकल वापरून एक आदर्श घालुन देण्याची महत्वाची गरज जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी प्रतिपादीत केली असुन शाश्वत शेतीला पाठिंबा सुद्धा देण्यावर त्यांनी भर दिला असुन शाश्वत शेती पद्धतीचा अवलंब करणाऱ्या शेतांतून शेतकरी -कास्तकरी यांची सर्वच उत्पादने खरेदी करावी लाग तील तरच यामुळे जमिनीचे आरोग्य आणि जैवविविधता टिकवून ठेवण्यास मदत होणार आहे.

### 'समुदाय-आधारित शेती'



उपक्रम मोठ्या प्रमाणावर हाती घेउन सर्वच स्तरातील व्यक्ती संघटना एन जी ओ व पदाधिकारी यांचा सहभाग वाढविण्यासाठी अथक परिश्रम घ्यावे लागतील असे स्पष्ट मत जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त करून पर्यावरणीय बदलांचे निरीक्षण करणाऱ्याआणि संशोधन कार्यात मौल्यवान माहितीचे योगदान देणाऱ्या 'नागरिक विज्ञान' प्रकल्पांची निर्मिती करून या मध्ये परिणामकारक सहभाग वाढविण्याचा ' स्पेशल पर्पज प्रोग्राम ' डिजाईन करावा लागेल असे नमुद करून ते म्हणाले की, पर्यावरणीय निरीक्षणाच्या कामात लोकसहभाग वाढवून घेण्यावर लक्ष केंद्रीत करून ग्राम आणि प्रभाग पातळीवर पर्जन्यमानाचे नमुने किंवा जमिनीच्या आरोग्याचा मागोवा घेणाऱ्या कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग उपक्रम हाती घेऊन 'जागतिक पर्यावरण दिन २०२६' अशा महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर जगाला दिशा देण्याचे काम महाराष्ट्र करू शकतो असे अत्यन्त विश्वास दर्शक मत जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त करून जमिनीचे पुनरुज्जीवन, वाळवंटी करणाचा सामना करणे आणि दुष्काळ- प्रतिकार क्षमता निर्माण करणे यांच्या महत्त्वाचे अर्थ समजून घेऊन,व्यक्ती पर्यावरणीय शाश्वततेसाठी महत्वाचे योगदान देऊ शकतात म्हणुन कणखर आणि शाश्वत भविष्य घडवण्याच्या दिशेने केलेली प्रत्येक छोटी कृतीही मोलाची ठरू शकते असे स्पष्ट प्रतिपादन जेष्ठ पर्यावरण अभ्यासक आणि जेष्ठ जल तज्ञ डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केले आहे.

## 'टीसीएस', 'एसबीआय'नंतर 'विप्रो'मध्येही 'कॉर्पोरेट जिहाद'!

# धर्मांतरास नकार दिल्याने 'विप्रो' कंपनीतील हिंदू महिला कर्मचाऱ्याला नोकरीवरून काढले; हिंदु जनजागृती समितीची कारवाईची मागणी !

पुणे, दि. ४ (प्रतिनिधी)- नाशिक येथील 'टीसीएस' कंपनीतील धक्कादायक प्रकार, त्यानंतर नुकतेच मुंबईतील 'एसबीआय' बँकेतील प्रकरण ताजं असतांनाच आता पुण्यातील हिंजवडी येथील 'विप्रो टेक्नॉलॉजीज लिमिटेड' या नामांकित कंपनीत 'कॉर्पोरेट जिहाद' आणि धार्मिक छळाचे अत्यंत गंभीर अनब संतापजनक प्रकरण उघडकीस आले आहे. या प्रकरणी हिंजवडी पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षकांकडे तक्रार देण्यात आली आहे. या प्रकरणातील पीडीत हिंदु महिलेने पत्रकार परिषदेत प्रत्यक्ष उपस्थित राहून या प्रकरणाला वाचा फोडली.

'कंपनीत कार्यरत असतांना माझ्यावर इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी आणि एका मुस्लिम व्यक्तीसोबत शारीरिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी पद्धतशीरपणे प्रचंड मानसिक दबाव निर्माण केला. या धर्मविरोधी आणि अनैतिक प्रकाराला मी ठामपणे नकार देत कंपनी प्रशासनाकडे तक्रार केली; मात्र कंपनी प्रशासनाने आरोपीवर कारवाई करण्याऐवजी मलाच नोकरीवरून काढून टाकले', असे या प्रकरणातील पीडीत महिला कर्मचारीने सांगितले. या संतापजनक घटनेचा हिंदु जनजागृती समिती जाहीर निषेध करते. तसेच या प्रकरणी हिंदु जनजागृती समिती आणि पीडित महिला आम्ही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे याप्रकरणी तातडीने लक्ष घालून या प्रकरणाचा उच्चस्तरीय तपास करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करत आहोत, असे हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्याचे संघटक श्री. सुनील घनवट यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

पुणे येथील 'श्रमिक पत्रकार भवन' येथे पार पडलेल्या या पत्रकार परिषदेला पीडित हिंदू महिला (माजी कर्मचारी, विप्रो कंपनी), श्री. पराग गोखले (पुणे जिल्हा समन्वयक, हिंदु जनजागृती समिती), अधिवक्ता श्री. विवेक भोसले (राष्ट्रभक्त अधिवक्ता समिती, पुणे), अधिवक्ता गोपाळ तेलंग आणि कु. क्रांती पेटकर (रणरागिणी शाखा) प्रामुख्याने उपस्थित होते. या प्रकारामुळे कॉर्पोरेट क्षेत्रातील हिंदू महिलांच्या सुरक्षेचा आणि कंपन्यांच्या अंतर्गत व्यवस्थापनाच्या पारदर्शकतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पीडित हिंदू महिलेने सांगितले की, ती विप्रो कंपनीत प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजावत होती; मात्र काही काळापूर्वी तिच्याच टीममधील शाहिना रफिक नावाच्या एका महिला सहकाऱ्याने तिच्या (पीडितेच्या) वैयक्तिक आयुष्यात जाणीवपूर्वक अवाजवी हस्तक्षेप करण्यास सुरूवात केली. शाहिनाने पीडितेला तिच्या ओळखीच्या 'शेख' नावाच्या मुसलमान व्यक्तीशी शारीरिक संबंध प्रस्थापित करण्याचा, तसेच स्वतःचा मूळ हिंदू धर्म सोडून इस्लाम धर्म स्वीकारण्याचा खूप आग्रह धरला. 'जर तू इस्लाम स्वीकारून मुस्लिम व्यक्तीसोबत राहिलीस, तर तुला दुबईत ऐषोआरामात आणि शांततेत जीवन जगता येईल', अशी प्रलोभने आणि आमिषेही तिला सातत्याने दाखवण्यात येत होती. या सततच्या धार्मिक आणि मानसिक छळाला कंटाळून पीडितेने शाहिनाशी बोलणे पूर्णपणे बंद केले आणि केवळ कार्यालयीन कामापुरता मर्यादित संपर्क ठेवला. पीडितेच्या म्हणण्यानुसार या वाढत्या त्रासाची आणि छळाची रीतसर तक्रार तिने कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली होती; परंतु विप्रो प्रशासनाने आरोपी शाहिना रफिक हिच्यावर कोणतीही दंडात्मक किंवा प्रतिबंधात्मक कारवाई केली नाही. उलटपक्षी, जेव्हा पीडितेने शाहिनाच्या वैयक्तिक फोन कॉल्सना प्रतिसाद देणे पूर्णपणे थांबवले, तेव्हा शाहिनाने सूडबुद्धीने पीडितेचे संभाषण छुप्या पद्धतीने रेकॉर्ड केले आणि तथ्य वाकवून पीडितेविरुद्धच कंपनीच्या ओंबड्स कमिटीकडे खोटी तक्रार दाखल केली. या संपूर्ण प्रकरणातील वरिष्ठ अधिकारी वसीम यानेही शाहिनाला उघडपणे पाठीशी घालत तिच्यावर कारवाई करण्यास साफ नकार दिला. तसेच, विप्रोच्या एचआर व व्यवस्थापन समितीचे सदस्य झीशान अहमद आणि अन्य सदस्यांनी पीडितेची बाजू, तिची पूर्वतक्रार आणि पुरावे पूर्णपणे फेटाळून लावत एकतर्फी कारवाई केली.

या अन्यायाचा कळस ऑगस्ट २०२५ च्या अखेरीस गाठला गेला. एचआर प्रतिनिधी प्रशांत जी.आर. याने पीडितेला एका 'मायक्रोसॉफ्ट टीम्स' मीटिंगसाठी बोलावले. त्या मीटिंगदरम्यान टेक्नीकल ट्रीक्स वापरून पीडितेच्या लॅपटॉपचा स्क्रीन कंट्रोल स्वतःकडे घेतला आणि तिला कोणतीही पूर्वकल्पना न देता, तिच्या संमतीविना बळजबरीने तिच्याच सिस्टीमवरून राजीनामा सादर करण्यास भाग पाडले. कोणत्याही पूर्वसूचनेविना, नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांना हरताळ फासून आणि चौकशीअंती स्वतःचे म्हणणे मांडण्याची कायदेशीर संधी न देता अशाप्रकारे बळजबरीने राजीनामा घेणे, हे भारतीय श्रम व कामगार कायद्यांचे थेट उल्लंघन आहे, असे अधिवक्ता भोसले यांनी या वेळी सांगितले.

**न्यायासाठी ५० लाखांच्या भरपाईसह विप्रो प्रशासनाला कायदेशीर नोटीस!**

या संस्थात्मक अन्यायाविरुद्ध आणि छळाविरुद्ध पीडित महिलेने आपल्या वकिलांमार्फत विप्रो प्रशासनाला कायदेशीर नोटीस (ङशसरश्र छेींळलश) धाडली आहे. 'दबावाखाली आणि बळजबरीने लिहून घेतलेला राजीनामा हा कायद्याच्या दृष्टीने अवैध असून तो त्वरित रद्द करण्यात यावा, तसेच पीडितेला पूर्ण वेतनासह आणि सेवासातत्यासह पुन्हा सन्मानाने नोकरीवर रुजू करून घेण्यात यावे,' अशी मुख्य मागणी या नोटीसमध्ये करण्यात आली आहे. याशिवाय, पीडितेला झालेल्या अतोनात मानसिक त्रासापोटी, सामाजिक प्रतिष्ठेच्या नुकसानीपोटी ५० लाख रुपयांची आर्थिक नुकसान भरपाई द्यावी, कंपनीने अधिकृत लेखी माफी मागावी आणि मुख्य संशयित शाहिनासह तिला पाठीशी घालणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी, असेही त्यात ठणकावून सांगण्यात आले आहे. येत्या १५ दिवसांत कंपनीने यावर योग्य पावले न उचलल्यास दिवाणी, फौजदारी आणि कामगार न्यायालयात विप्रोविरुद्ध थेट खटला दाखल करण्याचा इशारा पीडित हिंदू महिलेने दिला आहे.

**पुण्याच्या आयटी क्षेत्रातील हिंदूविरोधी अजेंडा खपवून घेणार नाही!**

या वेळी हिंदु जनजागृती समितीचे श्री. सुनील घनवट म्हणाले की, या संपूर्ण प्रकरणात पीडित हिंदू महिलेला न्याय मिळवून देण्यासाठी आता हिंदु जनजागृती समिती मैदानात उतरली आहे. नाशिकमधील टीसीएस कंपनीच्या प्रकारानंतर पुण्याच्या आयटी कंपनीत उघडकीस आलेली ही घटना म्हणजे सुनियोजित 'कॉर्पोरेट जिहाद'चाच भाग आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये उच्च पदांवर बसून हिंदू महिलांच्या धार्मिक आणि वैयक्तिक स्वातंत्र्याची गळचेपी करण्याचा हा प्रकार अत्यंत चिंताजनक आहे. हा केवळ एकच प्रकार नसून अधिक प्रकरणे घडल्याची शक्यता नाकारता येत नाही. पुण्याच्या आयटी क्षेत्रातील हा हिंदूविरोधी अजेंडा आणि छळ कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही. अन्य मोठ्या कंपन्यांमध्ये असे प्रकार घडत आहेत का, याची शासनाने व्यापक चौकशी केली पाहिजे. कोणत्याही हिंदू महिलेवर अशा प्रकारचा अन्याय, धार्मिक छळ अथवा धर्मांतरासाठी दबाव येत असेल, तर त्यांनी न घाबरता हिंदु जनजागृती समितीच्या ७७३८२३३३३३ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, पूकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# महानगराच्या सर्वांगिण विकासासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे-विभागीय आयुक्त जी.श्रीकांत

## छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कामांचा आढावा

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सीएसएमआरडीए) अंतर्गत समाविष्ट गावांचा आणि झालर क्षेत्राचा नियोजनबद्ध, संतुलित, शाश्वत व सर्वसमावेशक विकास करण्यासाठी सर्व शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था आणि संबंधित यंत्रणांनी सक्रिय सहभाग नोंदवून परस्पर समन्वयाने काम करावे, असे निर्देश प्राधिकरणाचे आयुक्त तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले.

छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यालयातील सभागृहात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी विनय गौडा, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, सहआयुक्त अंजली धानोरकर, महानगर नियोजनकार हर्षल बाविस्कर, प्रभारी उपायुक्त सुनंदा पारवे, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी साधना बांगर तसेच एमआयडीसी, महसूल, ग्रामविकास व इतर विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी विभागीय आयुक्तांनी प्राधिकरण स्थापनेचा मूलभूत उद्देश आणि कार्यपद्धती याबाबत अधिकाऱ्यांना सविस्तर माहिती दिली. छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीत छत्रपती संभाजीनगर, गंगापूर, खुलताबाद, पैठण आणि फुलंब्री या पाच तालुक्यांतील एकूण ३११ गावांचा समावेश असून या संपूर्ण क्षेत्राच्या विकासासाठी विविध विकासकामांना गती देण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

ा ा ढ त य ा ा औद्योगिकीकरणामुळे आणि लोकसंख्येच्या वाढत्या दबावामुळे भविष्यातील गरजा लक्षात घेऊन पाणीपुरवठा, रस्ते, वीजपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी प्रक्रिया, अग्निसुरक्षा यांसारख्या मूलभूत सुविधांचे सक्षम नियोजन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यासाठी जीआयएस सर्वेक्षण, जमिनीचे मॅपिंग, विकास आराखड्यासाठी आवश्यक माहिती संकलन आणि तांत्रिक प्रक्रिया विहित मुदतीत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

प्राधिकरण क्षेत्रातील मालमत्ता कर आकारणी, गुंठेवारी नियमितीकरण, वर्ग-२ मालमत्तांचे चुकीने वर्ग-१ मध्ये झालेल्या रूपांतरणाची प्रकरणे, हस्तांतरण न झालेल्या जमिनींचे विषय यावर कायदेशीर व नियमानुसार कार्यवाही करून प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. त्याचबरोबर अनधिकृत बांधकामांवर प्रभावी कारवाई करण्यासह प्रमुख मार्गालगतची अतिक्रमणे नियोजित कृती आराखड्यानुसार हटविण्यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम राबवावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महानगर प्रदेशाचा शाश्वत विकास साधायचा असेल तर घनकचरा व्यवस्थापनाला प्राधान्य देणे अत्यावश्यक असल्याचे सांगत विभागीय आयुक्तांनी वाळूज, शेंद्रा आणि बिडकीन औद्योगिक क्षेत्रांसह आवश्यक ठिकाणी जागा उपलब्ध करून आधुनिक कचरा प्रक्रिया केंद्रे उभारण्याची प्रक्रिया गतीमान करण्याच्या सूचना दिल्या. शहरासह ग्रामीण भागातील कचरा व्यवस्थापनासाठी एकात्मिक व्यवस्था निर्माण करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. यानंतर झालेल्या सीएसएमआरडीएच्या त्रिस्तरीय उपसमितीच्या बैठकीत विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा आणि महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी प्राधिकरण क्षेत्रातील नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देणे आणि नियोजित विकास साध्य करणे हेच प्राधिकरणाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे सांगितले. प्राधिकरणातील रिक्त पदे भरण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ बाह्यस्त्रोत आणि कंत्राटी पद्धतीने उपलब्ध करून घेण्याबाबत चर्चा करण्यात आली. यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमध्ये अवलंबिल्या जाणाऱ्या कार्यपद्धतीचा आदर्श घेण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.



तसेच विविध विकास प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) नियुक्ती प्रक्रिया, निवड निकष आणि प्रशासकीय बाबींवर सविस्तर चर्चा झाली. यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले. याशिवाय, विकास आराखड्याच्या अंमलबजावणीदरम्यान टीडीआर प्रदान करण्याची प्रक्रिया महानगरपालिकेच्या धर्तीवर राबविण्याबाबतही सकारात्मक चर्चा करण्यात आली.

बैठकीत महानगर प्रदेशाच्या भविष्यातील विकासासाठी आवश्यक नियोजन, पायाभूत सुविधा उभारणी आणि प्रशासकीय समन्वय यावर सखोल विचारविनिमय करण्यात आला.

# महाविकास आघाडीला धक्का, विधानपरिषद निवडणूकीतून डोणगावकरांची माघार

## गणेश लोखंडे यांना पुरस्कृत उमेदवार म्हणून घोषित करण्याची नामुष्की

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- आमदार अब्दुल सत्तार यांचे चिरंजीव अब्दुल समीर यांनी औरंगाबाद - जालना विधानपरिषद निवडणुकीतून माघार घेतल्यानंतर आणखी एक खळबळजनक घटना घडली आहे. महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार एड देवयानी कृष्णा पाटील डोणगावकर यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. त्यांनी आपला अर्ज वैयक्तिक कारणांमुळे मागे घेतल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. उबाठाचे अपक्ष उमेदवार गणेश लोखंडे यांना पुरस्कृत उमेदवार म्हणून घोषित करण्याची नामुष्की उबाठावर आली आहे. समीरने आपला अर्ज मागे घेतल्याने महायुतीचे उमेदवार सुहास शिरसाट यांचा विजय निश्चित मानला जात आहे. यानंतर डोणगावकर यांनी माघार घेतल्यानंतर महाविकास आघाडीला धक्का बसला आहे. गणेश लोखंडे यांनी निवडणूक लढणार असल्याचे जाहीर केले आहे.

संजय राऊत यांनी ट्विट करत म्हटले की, कृष्णा डोणगावकर व देवयानी डोणगावकर (छत्रपती संभाजी नगर) यांची शिवसेनेतून हकालपट्टी करण्यात आली आहे.



पक्षविरोधी कारवायात सहभागी झाल्या बद्दल शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने ही कारवाई करण्यात आली आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

मात्र, डोणगावकरांनी अचानक माघार घेतली असली तरी ठाकरे गटाने कमालीच्या सावधगिरीने खेळलेल्या 'बॅकअप प्लान'मुळे महाविकास आघाडीची अब्रू वाचली. आता छत्रपती संभाजीनगर-जालना विधान परिषदेसाठी गणेश लोखंडे महाविकास आघाडीचे उमेदवार असणार असतील, असे जाहीर करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे गटनेते गणेश लोखंडे यांना छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणूक - २०२६ साठी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार म्हणून घोषित करण्यात आले आहे. महाविकास आघाडीतील घटक पक्षांच्या सहमतीने लोखंडे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. सदरील निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून गणेश लोखंडे यांच्या विजयासाठी सर्व घटक पक्ष एकजुटीने काम करणार असल्याची घोषणा महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून करण्यात आली आहे.

# प्रस्तावित मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा हा राज्यातील हजारो प्राचीन देवस्थानांवर अन्याय आघात करणारा आहे-प्राध्यापक संजय गायकवाड

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेला मंदिर इनामी जमीन हक्क निर्माण कायदा हा राज्यातील हजारो प्राचीन देवस्थानांवर अन्याय व आघात करणारा आहे तसेच हिंदूंच्या ज्या धार्मिक संस्था आहेत त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारा आहे.देवस्थानच्या जमिनीचे मालक स्वतः भगवान आहेत मंदिराचे विश्वस्त आणि पुजारी हे व्यवस्थापक म्हणून काम करतात हा भाग लक्षात घेऊन ज्या मंदिरांच्या जमिनीवर अतिक्रमण झालेले आहे ती जागा सरकारने पुनश्च मंदिरांना मिळवून द्यावी असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषद देवगिरी प्रांताध्यक्ष संजय गायकवाड यांनी पत्र परिषदेत केले. यावेळी विश्व हिंदू परिषद धार्मिक पुंज क्षेत्र प्रमुख संजयजी मुद्राळे मंदिर अर्चक पुरोहित आयाम देवगिरी प्रांत प्रमुख राजीव जहागीरदार कायदेशीर सल्लागार माधवराव भोकरीकर विलासराव सोनवणे आणि मंदिर आयामाचे शिवाजीराव दहिवाल उपस्थित होते.




यावेळी बोलताना एडवोकेट भोकरीकर म्हणाले मागील अनेक शतकांपासून त्या त्या वेळच्या संस्थानिकांनी सत्ताधाऱ्यांनी मंदिराच्या नित्य पूजाअर्चा अन्नदान उत्सव धर्मशाळा वेदपाठ शाळा गौ शाळा यासाठी जमिनी इनाम स्वरूपात दिल्या आहेत. हा कायदा पारित झाला तर मंदिराच्या उत्पन्नावर गंभीर परिणाम होऊन अनेक धार्मिक आणि सामाजिक उपक्रम बंद पडतील

एडवोकेट विलास सोनवणे या कायद्याविषयी माहिती देताना म्हणाले ज्या जागा जमिनी देवस्थानला इनाम स्वरूपात प्राप्त झाल्या आहेत. त्या जमिनीवर परिसरातील भूमाफिया आणि गुंडांनी अतिक्रमण केले आहे.त्या अत्यंत अल्प दरात जमिनी देऊन टाकण्यासंदर्भातला जो कायदा आणण्याचा विचार करीत आहे त्याला आमचा पूर्णपणे विरोध आहे.

महाराष्ट्र शासनाने देवस्थान जमिनीवरील भुमाफियानी केलेले अतिक्रमण काढून पुनश्च या जमिनी मंदिर विश्वस्तांकडे सोपवाव्यात.

देवस्थानच्या जागे संदर्भात महाराष्ट्र शासनाने एक तज्ञ समिती नेमून अभ्यासानंतर कायद्याचे प्रारूप तयार करावा.कोणत्याही परिस्थितीत हा निर्णय घेण्यापूर्वी संपूर्ण महाराष्ट्रातील देवस्थान आर्चक पुजारी आणि हिंदू संघटनांचे पदाधिकारी यांच्याशी व्यापक चर्चा करून त्यानंतरच सर्व संमतीने निर्णय करावा असे राजीव जहागीरदार म्हणाले.

# नागरिकांच्या सुरक्षेसाठी मनपा सज्ज!; अग्निशमन परवाना नसलेल्या हॉटेल्ससह सर्व आस्थापनांवर कारवाईचे संकेत

## फायर ऑडिट व तपासणी मोहीम राबविण्याचे स्थायी समिती सभापती मकरिये यांचे आदेश

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- दिल्लीतील एका हॉटेलमध्ये घडलेल्या भीषण अग्निकांडात २१ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाल्यानंतर छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रशासनाने शहरातील अग्निसुरक्षा व्यवस्थेबाबत तातडीने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. शहरातील नागरिकांच्या जीवित सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत अग्निशमन परवाना नसलेल्या तसेच आवश्यक अग्निसुरक्षा यंत्रणांचा अभाव असलेल्या आस्थापनांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी दिले.त्यांनी याबाबत तात्काळ

आज मनपा मुख्यालयात अग्निशमन विभागाची बैठक घेतली. यात त्यांनी शहरातील सर्व हॉटेल्स, खाजगी रुग्णालये, कोचिंग क्लासेस, अभ्यासिका, जिम, खासगी शाळा, मॉल्स आणि व्यावसायिक आस्थापनांची सखोल तपासणी करण्याचे आदेश दिले. ज्या आस्थापनांकडे वैध अग्निशमन परवाना नाही अथवा आवश्यक अग्निसुरक्षा उपकरणे उपलब्ध नाहीत, त्यांना तात्काळ नोटीस बजावून नियमांनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी सर्व संबंधित आस्थापनांचे फायर ऑडिट करण्यावर भर देत, अग्निसुरक्षा नियमांचे काटेकोर पालन होत आहे की नाही याची खातरजमा करण्याचे निर्देश दिले. 'नागरिकांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या निष्काळजीपणाला माफी दिली जाणार नाही. शहरात दिल्लीसारखी दुर्घटना घडू नये, यासाठी प्रशासन दक्ष असून आवश्यक ते सर्व उपाय तत्काळ राबविण्यात येतील,' असे सभापती मकरिये यांनी सांगितले. बैठकीस आरोग्य सभापती डॉ. सुनीता सोळुंके, गृहनिर्माण व समाजकल्याण समिती सभापती जालिंदर शेंडगे, अतिरिक्त आयुक्त (२) कल्पिता पिंपळे, उपआयुक्त तथा अग्निशमन विभाग प्रमुख लाखिचंद चव्हाण, अग्निशमन अधिकारी अशोक खांडेकर तसेच प्रभारी आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. उज्वला भामरे उपस्थित होते. मनपा प्रशासनाच्या या निर्णयामुळे शहरातील सार्वजनिक व व्यावसायिक आस्थापनांच्या अग्निसुरक्षा व्यवस्थेवर अधिक प्रभावी नियंत्रण येणार असून नागरिकांच्या सुरक्षेला बळकटी मिळणार आहे.

# अतिजोखीमग्रस्त भागांमध्ये विशेष कारवाई; मान्सूनपूर्व अबेट मोहिमेला उल्लेखनीय यश

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आरोग्य मलेरिया विभाग यांच्या वतीने दिनांक १ जून २०२६ पासून संपूर्ण शहरात झोन क्रमांक १ ते १० अंतर्गत प्रभाग निहाय धडक अबेट मोहीम २०२६ यशस्वीपणे राबविण्यात आली. सदर मोहीम शहरातील अतिजोखीमग्रस्त भाग, प्रभाग व परिसरांमध्ये व्यापक स्वरूपात राबविण्यात आली असून डेंग्यू, मलेरिया तसेच इतर डासजन्य आजारांच्या प्रतिबंधासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या.

महानगरपालिकेचे महापौर समीर राजुरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, विरोधी पक्षनेता समीर साजिद, सभापती स्थायी समिती अनिल मकरिये,




आयुक्त अमोल येडगे तसेच सभापती वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती श्रीमती डॉ. सुनीता सोळुंके यांच्या आदेशानुसार, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. उज्वला भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जीवशास्त्रवेत्ता व साथरोग अधिकारी डॉ. सय्यद सुमैय्या नाज यांच्या अधिपत्याखाली ही मोहीम शहरातील सर्व १० झोनमध्ये व्यापक स्वरूपात राबविण्यात आली.

मोहिमेदरम्यान आरोग्य मलेरिया विभागातील मलेरिया पर्यवेक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, मलेरिया फवारणी कर्मचारी, एम.पी.डब्ल्यू. व आशा सेविका यांचा मार्फत घरभेटी देऊन कंटेनर सर्वेक्षण, अबेट औषध टाकणे, माहितीपत्रकांचे वितरण, जनजागृतीपर स्टिकर्स

**मोहिमेअंतर्गत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशील पुढीलप्रमाणे**

* सर्वेक्षण करण्यात आलेली घरे : ५८७३७
* अबेट औषध टाकण्यात आलेली कंटेनर्स : ४४०३१
* माहितीपत्रकांचे वितरण करण्यात आलेली घरे : ६९९४
* जनजागृतीपर स्टिकर्स लावण्यात आलेली घरे : ४२९३

लावणे तसेच डासजन्य आजारांबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचे काम केले. यासोबतच नागरिकांना 'कोरडा दिवस' पाळण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. घर व परिसरातील पाणी साठवणाऱ्या टाक्या, कुलर, फुलदाण्या, विविध भांडी व इतर कंटेनर नियमित स्वच्छ ठेवण्याबाबत तसेच साचलेले पाणी तात्काळ हटविण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

सदर धडक अबेट मोहीम शहरभर अत्यंत प्रभावी, नियोजनबद्ध व यशस्वीरीत्या राबविण्यात आली. नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, आरोग्य विभागाचे समन्वित प्रयत्न तसेच लोकप्रतिनिधींचे सहकार्य यामुळे मोहिमेस उल्लेखनीय यश मिळाले. डेंग्यू, मलेरिया व इतर डासजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी नागरिकांनी घर व परिसर स्वच्छ ठेवून आरोग्य विभागास पुढील काळातही सहकार्य करावे, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे.

(पान १ वरुन)

### ममता बॅनर्जींना धक्का;..

माझ्या वैयक्तिक कारणांमुळे पदाचा राजीनामा दिला आहे. यामागे दुसरं काहीही राजकारण नाही. जोपर्यंत मी महापौर होते, तोपर्यंत मी लोकांसाठी काम केलं आहे. आता मी नगरसेविका म्हणून काम करत राहणार आहे. मला अनेक कार्यकर्त्यांकडून फोन येत आहेत. मला बिधाननगरच्या लोकांकडून खूप सपोर्ट मिळाला. मी त्यांची सदैव आभारी राहील. माझ्या मनात कोणाबद्दलही नाराजी नाही'', असं कृष्णा चक्रवर्ती यांनी राजीनामा देताना म्हटलं आहे.

### तुकाराम मुंढे यांना...

राष्ट्रपती सन्मान (पुरस्कार )देण्यात यावा अशी मागणी सावजी यांनी केली आहे.

माजी राज्यमंत्री सावजी यांनी पत्रात म्हटले आहे की, तुकाराम मुंडे यांच्या अंदाजे २१ वर्षांच्या सेवेमध्ये तब्बल २४ वेळा बदल्या झाल्या आहेत. त्यांच्या या बदल्यांमागे कोणताही हलगर्जीपणा, कामातील अनियमितता, भ्रष्टाचार किंवा वरिष्ठांचा अवमान करणे अशी कारणे नसून, या संपूर्ण प्रकरणाची राष्ट्रपतींनी चौकशी करावी. मुंडे यांनी जिथे जिथे काम केले, तिथे अत्यंत इमानदारीने आणि भ्रष्टाचारमुक्त सेवा दिली आहे, असे सावजी यांनी आवर्जून नमूद केले.मी गेल्या ५० वर्षांत तीन वेळा आमदार आणि एक वेळा मंत्री राहिलो आहे.

# पशुसंवर्धन आयुक्तालयात राज्यस्तरीय कुक्कुट समन्वय समितीची बैठक संपन्न

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी) शासनाच्या विविध योजना व सवलतीचा लाभ घेण्यासाठी राज्यातील सर्व कुक्कुटपालकाने, शेतकरी बांधवानी जिल्ह्याच्या पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालयात अधिकृत नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय, विभागाचे डॉ. नानासाहेब कदम यांनी केले.

पशुसंवर्धन आयुक्तालय पुणे येथे आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कुक्कुट समन्वय समितीची महत्त्वाची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत कुक्कुटपालन व्यवसायातील सद्यस्थिती, कायदेशीर नियम आणि व्यावसायिकांच्या विविध समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीस राज्यस्तरीय कुक्कुट समन्वय समितीचे अनिल खामकर, डॉ. प्रसन्न पेडगावकर, शुभम महल्ले, धनंजय डांगे, विलास साळवी, सुदर्शन पोकळे, विठ्ठल चौधरी, शरद मोडांबे आदींसह पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

राज्य सरकारने पशुसंवर्धन व्यवसायाला कृषी क्षेत्राचा दर्जा बहाल केल्यामुळे आता पोल्ट्री व्यावसायिकांना शेतीसाठी मिळणाऱ्या सवलतींचा थेट फायदा होणार आहे. या अंतर्गत वीज बिलात सवलत मिळवण्यासाठी राज्यातील ९० हजार लाभार्थ्यांची माहिती संकलित करण्यात आली होती. त्यापैकी अचूक तपशील सादर करणाऱ्या ६३ हजार व्यावसायिकांची माहिती पशुसंवर्धन विभागाने महावितरणकडे वर्ग केली आहे. उर्वरित व्यावसायिकांनी अचूक ग्राहक क्रमांकासह माहिती जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांचे कार्यालयाकडे तातडीने सादर करावी, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी या बैठकीत केले.

कुक्कुटपालनासाठी वापरण्यात येणाऱ्या पक्षी खाद्याच्या बॅगवर त्यातील अंतर्गत घटकांची स्पष्ट नोंद असण्याबाबतच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला. या व्यवसायात पारदर्शकता आणण्यासाठी काय उपाययोजना करता येतील, कंत्राटी कुक्कुटपालन करताना अनेक कंपन्यांकडून दरवेळी ग्रामपंचायतीचे नवीन 'ना हरकत प्रमाणपत्र' (एनओसी) मागितले जाते, यामुळे शेतकऱ्यांचा मोठा वेळ वाया जातो. त्यामुळे एकदा मिळालेले प्रमाणपत्र पुढील करारांसाठी ग्राह्य धरावे, अशी मागणी समिती सदस्यांनी केली. ग्रामपंचायत कर आकारणीबाबत ग्रामविकास विभागाकडे सकारात्मक पाठपुरावा करण्याचे आश्वासन आयुक्तांनी व्यावसायिकां दिले. 'पशुसंवर्धन उपआयुक्त' कार्यालयात अधिकृत नोंदणीचे आवाहन

शासनाच्या विविध योजना व सवलतींचा लाभ घेण्यासाठी राज्यातील सर्व कुक्कुटपालकांनी आपापल्या जिल्ह्याच्या 'पशुसंवर्धन उपआयुक्त' कार्यालयात अधिकृत नोंदणी करण्याचे आवाहनही आयुक्तांनी केले.

वीजदर सवलतीसह साथरोग प्रचार-प्रसिद्धी, प्रतिबंधात्मक लसीकरण, खाद्य विश्लेषण व दर्जा नियंत्रण, तसेच पशुसंवर्धनविषयक 'किसान क्रेडिट कार्ड' अंतर्गत मिळणारे अर्थसाहाय्य यावरही सविस्तर मंथन झाले. या सर्व विषयांवर पशुसंवर्धन विभागामार्फत लवकरच सकारात्मक निर्णय घेतले जातील, अशी ग्वाही आयुक्तांनी दिली.

राज्य सरकारने जाहीर केलेल्या 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने'तील कुक्कुटपालनास चालना देणाऱ्या योजनांविषयी या बैठकीत सकारात्मक चर्चा करण्यात आली.

# महाराष्ट्राची विक्रमी झेप; सौर कृषिपंपांमध्ये गाठला देशात सर्वाधिक १० लाखांचा टप्पा

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- सौर कृषिपंपामध्ये विश्वविक्रम करणाऱ्या महाराष्ट्राने बुधवारी (दि. ३) देशात सर्वाधिक १० लाख सौर कृषिपंपांचा टप्पा पूर्ण केला आणि देशपातळीवर एक नवा इतिहास रचला आहे. पीएम कुसुम-बी व मागेल त्याला सौर कृषिपंप अंतर्गत महाराष्ट्राने ही ऐतिहासिक कामगिरी केली आहे. देशातील एकूण सौर कृषिपंपांपैकी तब्बल ६४ टक्के सौर पंप एकट्या महाराष्ट्रात कार्यान्वित झाले आहेत. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी या अभिमानास्पद कामगिरीमध्ये योगदान देणाऱ्या सर्वांचे अभिनंदन केले आहे.

प्रधानमंत्री कुसुम-बी आणि राज्य शासनाच्या मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेची महावितरणकडून प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने सौर कृषिपंपामध्ये मोठी आघाडी घेतली आहे.

देशात आतापर्यंत एकूण १५ लाख ६२ हजार २८९ सौर कृषिपंप कार्यान्वित करण्यात आले आहेत. त्यापैकी तब्बल १० लाख ४७२ (६४ टक्के) एकट्या महाराष्ट्रात तर उर्वरित सर्व राज्यांमध्ये एकूण ५ लाख ६१ हजार ८१७ (३४ टक्के) कृषिपंप कार्यान्वित झाले आहेत. महाराष्ट्रानंतर हरियाणा- १ लाख ९० हजार, राजस्थान- १ लाख २७ हजार, उत्तरप्रदेश- ७१ हजार ५३८, झारखंड- ६१ हजार ४५२, गुजरात- २१ हजार ८९४ अशी क्रमवारी आहे. याआधी महाराष्ट्राने महावितरणच्या माध्यमातून मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेत एकाच महिन्यात तब्बल ४५ हजार ९११ सौर कृषिपंप कार्यान्वित करण्याची विश्वविक्रमी कामगिरी केली आहे. त्याची नोंद डिसेंबर २०२५ मध्ये गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये घेण्यात आली आहे.

मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेमध्ये सर्वसाधारण शेतकऱ्यांना केवळ १० टक्के आणि अनुसूचित जाती-जमाती शेतकऱ्यांसाठी केवळ ५ टक्के लाभार्थी हिस्स्यावर तीन, पाच व ७.५ अश्वशक्तीचे सौर कृषिपंप देण्यात येत आहेत. सौरपंपाच्या पॅनेल्समधून २५ वर्षे वीज निर्मिती होते. त्यामुळे आतापर्यंत १० लाखांवर शेतकऱ्यांची वीजबिलांमधून मुक्तता झाली आहे. तर दिवसा अखंडित वीजपुरवठा मिळत आहे. यासोबतच शेतातील विद्युत अपघातांचा धोकाही पूर्णतः टळला आहे. या सौर पॅनेल्समुळे सिंचनासह शेत घरातील विविध उपकरणे, मोबाईल चार्जिंग व ई-वाहन चार्जिंग करणेही सहज शक्य झाले आहे. तसेच शिल्लक विजेच्या आधारे शेतकऱ्यांना छोटे कृषिपूरक अन्य व्यवसाय सुरू करण्याची संधी मिळाली आहे.

या योजनेतील प्रत्येक सौरपंपाला ५ वर्षांची वॉरंटी देण्यात आली आहे. या कालावधीत देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी पुरवठादार एजन्सीवर बंधनकारक आहे. तसेच सोलर पॅनेल्स आणि पंपाचे नुकसान, नैसर्गिक आपत्ती तसेच चोरीविरोधी विमा संरक्षणही उपलब्ध आहे. सौर कृषिपंपाबाबत काही तक्रार असल्यास संबंधित शेतकऱ्यांना महावितरण मोबाईल ॲप व वेबसाईट, २४ तास सुरु राहणारे टोल फ्री क्रमांक आणि संबंधित पुरवठादार कंपनीच्या वेबसाईटवर तक्रार करण्याची सोय उपलब्ध आहे.